# अजब तुझे सरकार



# अजब तुझे सरकार

अनुराधा गानू

मूळ इंग्रजी प्रकाशन

**कॅपिटल पनिशमेंट**

प्रभाकर देवधर

## सामान्य नागरीकास अर्पण

स्वातंत्र्य मिळुन अर्धशतक लोटले तरी सामान्य भारतीय नागरिकाची ससेहोलपट चालुच आहे. तो खऱ्या अर्थाने स्वतंत्र नाही. परकीय शासन गेले आणि भारतीय दुःशासन आले त्याच्यावरचा भार मात्र दिवसेदिवस वाढतोच आहे.



# प्रेरणा....

मी १९८५ ते १९८९ हा राजीव गांधीच्या पंतप्रधानपदाच्या अन्तापर्यन्तचा चार वर्षाचा कालावधी भारताच्या राजधानीत– दिल्लीत –घालवला. दिल्लीत मी इलेक्ट्रॉनिकी आयोगाचा अध्यक्ष होतो. पांच निरनिराळया मंत्रालयाचे सचिव त्याचे सदस्य होते. माझ्याभोवती एका उच्च पदाचे वलय होते, आभा होती. मला राज्य मंत्र्याचा दर्जा होता. पण ग्यानबाची मेख ही होती की बहुतेकांना हा नुसता डामडौल आहे हे ठाऊक नव्हते त्या आयोगाला प्रत्यक्ष आज्ञा देण्याचा अधिकारच नव्हता. मात्र पंतप्रधानांचा खास मित्र असल्याने एक अलिखित पण जबरदस्त अधिकार पडछायेसारखा माझ्या वाटयास आला होता आणि तो पडछायी अधिकार (shadow power) धारण करण्यास मी कितीही नाराज असलो तरी त्या अधिकाराच्या नुसत्या पडछायेमुळे मी काही उपयुक्त कार्य करू शकलो. विशेष करून आपले मध्यवर्ती सरकार कसे काम करते किंवा करत नाही हे मी अगदी जवळून पाहू शकलो. दुर्दैवाने हे सुध्दा पहात होते काही काही लोक, कुठलंही पद नसतानाही केवळ अशाच पडछायी अधिकाराच्या जोरावर स्वतःच्या खाजगी फायद्याची कामे सराईतपणे करून घेत होते. दिल्लीत पाऊल ठेवले तेंव्हाच पैशापासून चार हात दूर रहाण्याचा माझा निर्धार होता. जिद्द होती ती विकास साधण्याची. पण लगेच लक्षांत आले की राष्टविकास दिल्लीत कुणाच्या खिजगणतीतही नव्हता. दिल्लीतील बहुसंख्य अंमलदारांनी सत्यापासून जणू फारकतच घेतली होती. प्रामाणिकपणा, सचोटी, नेकीने ते पुरे भांबावून जात

त्या काळातल्या आठवणी मला अजूनही व्यथित करतात, व्याकूळ करतात. व्यथित ह्याच जाणिवेने की त्या काळातील प्रत्येक दिवस मला आपला देश कुठे आहे आणि उलटपक्षी तो कुठे असू शकला असता ह्यातील तफावत अधिकाधिक प्रकर्षाने जाणवून देत होता म्हणून. ही दरी दिवसेंदिवस रुंदावतच चालली आहे अशी हताश जाणिवही मन पोखरत होती म्हणून. हेही उघड होतं की हे असं घडतय ते केवळ एका महत्वाच्या कारणामुळे...दिल्लीत ज्या पध्दतीने चक्रे अथवा सूत्रे हलतात किंवा हलत नाहीत म्हणून ! व्याकूळ ह्या विचाराने की एक उमदं राष्ट्र ५०-५५ वर्षापूर्वी स्वातंत्र्य मिळूनसुध्दा एका जाचक राजकीय यंत्रणेच्या शृंखलेत अडकून पडलेलं पाहून ! व्यथित ह्याही बोचणीने की सरकारी नोकर जेत्यांप्रमाणे एका स्वतंत्र राष्ट्राच्या नागरिकांना वागवू शकतात म्हणून ! दिल्लीत शोषितही इतरांचे शोषण करण्यात एक विकृत आनंद भोगताना मला दिसले. व्यथित ह्याच भावनेने की आज तरुण पिढीने अभिमानाने, आशेने मान वर करून बघावं असा एकही नेता आमच्यात नसावा म्हणून !

मी व्यथित होतो तसा क्रोधितही होतो कारण ह्या समस्यांवरचे सर्वच तोडगे एकतर फसवे ठरत म्हणून किंवा जे चार दोन तोडगे मी सुचवू शकलो ते ह्या राजकीय आकृतीबंधाच्या रणगाडयाखाली चिरडले गेले म्हणून व्यथित ह्याही टोचणीने की देशाची राजधानी ही उर्वरित देशापेक्षा किती भिन्न असू शकते हे पाहून संपूर्ण नोकरशाही आपापली पदे (करीयर्स) जोपासण्यात व राजकीय नेते आपापल्या खुर्च्या मिळवण्यात अथवा मिळवलेल्या टिकवण्यात पूर्णतः गर्क होते. स्वार्थ, अस्थिरता, असुरक्षितता व भावनाशून्यता

ह्या चक्रातून बाहेर कुणी पडूच इच्छित नव्हता. पण सर्वात मोठे दुःख हे की अजूनही गोष्टी तशाच घडताहेत...बदल जणू संभवतच नाही.

ह्या राजधानीतील वास्तव्याने मला बरेच काही शिकवले. सहनशीलता हा त्यातला मुख्य गुण. तो जणू माझा स्वभावधर्मच झाला दिल्लीत निभाव लागायचा तर हा अंगी बाणवावाच लागतो. ढोंगीपणा, खोटेपणा, मूर्खपणा, दिरंगाई, पैशाचा व वेळेचा अपव्यय...प्रत्येक गोष्टीबाबत इथे सहनशील व्हावेच लागते. इतकी सगळी शहाणीसुर्ती माणसं एकत्र आली की अशी वेडयासारखी का वागतात हा एक मला यक्षप्रश्नच पडला होता दिल्लीत आपले सरकार कसे चालत असे हे अगदी खास महालातून पहाण्याचा योगही आला. सिंहाच्या जबडयासारखी ह्या यंत्रणेची प्रत्येक गोष्टीवरची पकड पाहिली. दुर्दैव हेच की त्या कराल दाढेतून आपल्या विकासाची साधनेही सुटली नाहीत त्यातूनही एखादी कुणी तरुण, उत्साही, आदर्शवादी व्यक्ती ही घडी नव्याने बसवू लागलीच की तिचा बळी पडला म्हणूनच समजावे राजधानीतील ती चार वर्षे मला खरोखरच नजरकैदेसारखी जाचक वाटली. म्हणून माझ्या मूळ इंग्रजी काव्य संग्रहाचे नाव ठेवले Capital Punishment. पण गंमत अशी ही ह्या तुरुंगवासानेच मला अंतर्मुखही केले, चिंतनशील केले, ह्यातून मार्ग कसा काढता येईल ह्या विचारांकडे प्रवृत्त केले.

हे सर्व रामायण घडून एक तपाहून अधिक काळ उलटला आहे. ह्या रणगाडयाखाली असंख्य गोष्टी चिरडल्या गेल्या आहेत. राजीवचा अस्त झाला व माझ्यापुरता मैत्रीचा एक बंध तुटला. मी माझ्या मुंबईतल्या कामावर रुजु झालो. तरीही आत कुठेतरी एक बोच, एक सल जाणवत राहते...ह्या जाणवण्यात काही हशील नाही हे कळूनसुध्दा जाणवत राहते....हा देश कुठे आहे व कुठे असू शकला असता....

ह्या पुस्तकातील ओळीची तार त्या भावनांशी जुळलेली आहे आणि माझ्या अनेक मित्रांचा सूरही त्यात मिसळलेला आहे. त्यांच्याच आग्रहाखातर मी ह्या कविता आपल्यापुढे ठेवण्याचे धाडस करत आहे. उच्च पदावरचे कितीतरी सरकारी नोकर माझ्या मनातील

घनघोर निराशेचे भागीदार आहेत. ही निराशा, हा उद्‌वेग कुणा एका व्यक्तीविरुध्द नाही. पण हेच खरे दुःख आहे की ही यंत्रणा बिनचेहेऱ्याची आहे. ती तपशीलवार, तारीखवार फाईली निर्माण करण्यात पटाईत आहे पण तिच्यातून निर्माण काय होतो तर ...सत्यानाश ही यंत्रणा चालतेच अशी की प्रत्येकजण स्वतः नामानिराळा राहून इतर सर्वांना बोल लावू शकतो हा अनुभव इतका मनःस्तापक होता की माझ्यासारखा हाडाचा इंजिनियर चक्क कवी झाला

माझ्या त्या इंग्रजी कवितांचा संग्रह माझे मित्र श्री. बापू (वसंतराव) साठे ह्यांच्या आग्रहाखातर १९९३ मध्ये मी प्रसिध्द केला. पु. ल. देशपांडे आणि इतर अनेक मान्यवर साहित्यिकांनी त्या इंग्रजी संग्रहाचे कौतुकही केले. किंबहुना पुलंनी त्यांच्या नेहमीच्या मिश्कील शैलीत ह्या संदर्भात एक किस्साही ऐकवला. माझ्याप्रमाणेच त्यांनाही दिल्लीतला त्यांचा मुक्काम अत्यंत तापदायक व क्लेशकारी वाटला होता. दिल्ली सोडताना त्यांच्यासाठी आयोजित केलेल्या निरोपसमारंभात एका पत्रकाराने त्यांना दिल्लीतली कोणती गोष्ट सर्वात आवडली असा प्रश्न केला. पुलंनी फक्त त्यांनाच साजेल असे उत्तर दिले. दिल्ली स्थानकाकडे बोट दाखवून पुल म्हणालेः "ती फ्रंटियर मेल, जी मला दिल्लीपासून दूर घेऊन जाईल !" डॉक्टर श्रीराम लागू आणि इतर मित्रांनी ह्या कविता मराठीत रूपांतरीत कराव्या अशी सूचना मला अनेकवेळा केली. हे काम माझ्या स्वतःच्या आवाक्या बाहेरचे होते. ह्या कवितांना मराठी पेहेराव चढवण्यासाठी त्यांचे भाषांतर करून चालणार नव्हते. एखाद्या प्रतिभासंपन्न कविमनाच्या व्यक्तीने त्यांचे मुक्त रूपांतर करावयास हवे होते.

शेवटी आठ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर अशी प्रतिभासंपन्न आणि माझ्या कवितांच्या गर्भित विचारांशी संपूर्ण सहमत असणारी एक कवयित्री अचानक भेटली. लॉस एन्जलीसमध्ये गेली पंचवीस वर्षे स्थायिक झालेल्या सौ. अनुराधा गानू ह्या माझ्या अमेरिकेतील कंपनीच्या आर्थिक सल्लागार आहेत. त्या उच्चविद्या विभूषित आहेत. इतकी वर्षे महाराष्ट्रापासून दूर असूनही त्यांचे मराठी भाषा व साहित्यावरचे प्रेम यत्किंचितही कमी झालेले नाही हेही मला ठाऊक होते. त्यांनी स्वतंत्रपणे किंवा विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने अनेक गीते रचली आहेत, ती ध्वनिमुद्रित झाली आहेत, उत्तम कथांची लहानमोठी नाटयरूपांतरे करण्याचा त्यांना छंद आहे आणि गेल्याच वर्षी त्यांनी स्थलांतरित झालेल्या पहिल्या पिढीने काय गमावले व काय कमावले ह्याचा आलेख मांडणारे एक वगनाटय ' हरवले ते गवसले कां ? ' ह्या नावाने सादर केले आहे हेही मी जाणून होतो. पण त्यांना माझ्या कविता आवडतील आणि त्यांच्या सामाजिक जाणिवा माझ्यासारख्याच असतील हे मात्र मला अचानक समजले.

मे महिन्यात एक दिवस ई–मेलव्दारा चॅलेन्ज टू वीजडम आणि आय लव प्राईड ह्या दोन कवितांचे अतिशय अनुरूप आणि अप्रतिम पण मुक्तपणे केलेले रूपांतर अनुराधाताईंनी मला पाठवले. आठ वर्षे मी ज्याच्या शोधात होतो ते हे असे मला अचानक गवसले. त्यानंतर त्यांना मी औपचारिकपणे सर्व संग्रहाचे मराठीकरण करण्याचा आग्रह केला. माझ्या मूळ गर्भित विचाराला आणि कवितेमागच्या भावनेला मुळीसुध्दा धक्का न लावता त्यांनी अतिशय बेमालूमपणे माझ्या साऱ्या कवितांना खास मराठी साज चढवला. केवळ दहाबारा आठवड्यातच त्यांनी माझ्या साऱ्या कवितांचे सोने केले. ई–मेलच्या सुविधेमुळे हे सारे झपाट्याने साधता आले.

कै. श्याम जोशी हे कसलेले चित्रकार व व्यंगचित्रकार होते व त्यांना साहित्याचीही जाण होती. माझ्या संकल्पनांना त्यांनी त्यांच्या रेखाचित्रातून फार मोहक रूप दिले आहे.

माझ्या नसत्या उठाठेवींचा समंजस स्वीकार केल्याबद्दल अमृताचे आभार मानणे क्रमप्राप्तच आहे.

आता राहिले बापूसाहेब साठयांचे आभार...त्यांच्याच लकडयामुळे मी हा संग्रह पुस्तक रुपाने प्रसिध्द करण्याचा धीर करू शकलो. प्रस्तावना लिहायला मान्यता दिलीत तरच प्रसिध्द करीन ही माझी अटही त्यांनी लगेच मान्य केली माझ्या दिल्लीतील संपूर्ण वास्तव्यात बापूंनी मला जे काय वाटते ते निर्भयपणे व्यक्त करण्यास, चिकाटीने माझा स्वतःचा मार्ग चोखाळण्यास नेहमीच प्रोत्साहन दिले.

**प्रभाकर देवधर**

# मनोगत...

श्री. प्रभाकर देवधरांच्या Capital Punishment ह्या मूळ इंग्लीश कवितासंग्रहाचे हे स्वैर रूपांतर आपल्यापुढे ठेवताना मला अतिशय आनंद होत आहे. उत्तम इंग्लीश कवितांचे रूपांतर करणे हा माझा आजचा छंद नाही तर शालेय जीवनापासूनचा आहे माझ्या आठवणीतील पहिले नमूद करण्याजोगे रूपांतर म्हणजे William Wordsworth च्या "Lucy Gray or Solitude" ह्या कवितेचे..... "जेव्हा रानवारा शीळ घालतो" ह्या शीर्षकाखाली मी केले होते. माझ्या बाकावर शेजारी बसणाऱ्या मीरा कुर्तकोटीने ते पाहिले व आमच्या मराठीच्या घोलप बाईना दाखवले. त्यांना ते खूप आवडले व त्यांनी ते शाळेच्या फलकावर लावले. ते वाचून इतर अनेक शिक्षक-शिक्षिकांनी व विद्यार्थिनींनी माझे मनःपूर्वक अभिनंदन केले. ह्या अभिनंदन करणाऱ्यात माझी त्यावेळची वर्गमैत्रिण मेधा खानोलकरही (मेधा पाटकर) होती

त्यावेळी घोलप बाईनी अशाच समर्पक कविता करत रहा व इंग्लीश भाषेतील विचारधन, भावनांचे भांडार मराठी वाचकांपर्यन्त पोचव असा आशीर्वाद दिला होता. तो इतक्या वर्षानी फळाला येईल असे वाटले नव्हते ह्याला कारणे दोन. एक तर मी मराठी साहित्य किंवा भाषेची विद्यार्थिनी नाही तर रुक्ष आकडयात अडकलेली Accountant आहे व दुसरे म्हणजे गेली जवळजवळ २५ वर्षे भारताबाहेर अमेरिकेत वास्तव्य आहे त्यामुळे मराठी भाषेचा संपर्क तुटल्यासारखा झाला आहे. माहेर दुरावल्यावर जशी आईच्या प्रेमाची ओढ जास्त जाणवते तसेच मातृभूमी दुरावल्यावर मातृभाषेची-मायमराठीची ओढ किती तीव्र आहे हे जाणवते. चार आठ दिवसात कुणाशी मराठी बोलता आले नाही तर चुकल्यासारखे, अडखळल्यासारखे वाटते, इंग्लीश बोलून तोंड दुखल्यासारखे वाटते ह्याच ओढीपोटी, प्रेमापोटी मराठीचे वाचन व थोडेफार वेडेवाकुडे लेखन हातून घडते

Capital Punishment हा काव्यसंग्रह काही महिन्यांपूर्वी वाचनात आला आणि त्यातील विचार व भावनांमध्ये आपलेच प्रतिबिंब मला दिसले आणि झपाटल्यासारखी जवळजवळ सर्वच कवितांची रूपांतरे नकळत झाली

राजकारण, समाजकारण हे खरं तर माझे विषय नाहीत. पण वृत्तपत्रे, मासिके, दूरदर्शन ह्यामार्फत, भारतातील ह्या क्षेत्रांमधील अंदाधुंदीचे जे दर्शन घडते ते अतिशय निराशाजनक, क्लेशकारी, उद्वेगजनक, संतापजनक, असहाय, हतबल करणारे असते. थोडयाफार प्रमाणात सामाजिक कार्यांना आर्थिक हातभार लावण्यापलीकडे आपण हे चित्र बदलण्यासाठी फारसे काही करत नाही ही खंतही त्यात जाळत असते. पण ती व्यक्तही करता येत नाही कारण ह्यातला कुठलाच अनुभव आम्ही प्रत्यक्ष घेतलेला नसतो.

किंबहुना ह्या कवितासंग्रहाचेच हे वैशिष्ठ्य म्हणता येईल की ह्यातील दिल्लीवरच्या किंवा गांधी परिवारावरच्या कवितांचे विषय व अनुभव हे आमच्यासारख्या परदेशस्थ व्यक्तींनीच नव्हे तर भारतातल्या बहुतांश व्यक्तींनी पण अनुभवले नसणार. पण श्री. प्रभाकर देवधरांनी त्यांच्या ५ वर्षांच्या दिल्ली मुक्कामात, राजीव गांधींचे सल्लागार ह्या नात्याने, हे अनुभव चक्षुर्वैसत्यम् घेतलेले आहेत. त्यामुळे ते फार बोलके आहेत व त्यातून व्यक्त झालेली चीड, संताप, उद्वेग, क्लेश, असहायता ही केवळ भावनावेगातून झालेली नसून त्या अनुभवांच्या भरभक्कम पायावर उभी आहे.

त्यांनीच लिहिल्याप्रमाणे बहुसंख्य राजकारणी स्वार्थाने अंध झाल्यामुळे भावनाशून्य, कर्तव्यशून्य व स्वाभिमानशून्य झाले आहेत व बहुसंख्य विचारवंतही एकतर स्वतःतच गुरफटले आहेत किंवा ह्या नोकरशाहीच्या, ह्या राजकीय आकृतीबंधाच्या (Political System) रणगाडयाखाली गाडले किंवा चिरडले गेले आहेत, जात आहेत. अशावेळी एखादी संवेदनाक्षम आणि कर्तव्यतत्पर व्यक्ती कविता करण्यापलीकडे आणखी काय करू शकते ?

कवीच्याच शब्दात कवीने त्याची घुसमट, कोंडमारा, हतबलता, असहायता ह्यांना ह्या कवितांच्या रूपाने वाचा दिली आहे. पण मला ह्या कवितांनी आकृष्ट केले ते वेगळ्याच कारणास्तव. ह्या कविता वाचल्यानंतर मला ही घुसमट, हा कोंडमारा तर जाणवलाच पण त्याहीपेक्षा प्रकर्षाने जाणवला त्यातला आशावाद, त्यातील स्फूर्ती, प्रेरणा, मनुष्यातील सत्प्रवृत्तीबद्दलचा आदर व त्यावरील त्यांचा विश्वास ज्या विज्ञानाच्या बेफाम, बेलगाम वापरामुळे मनुष्य निसर्गावर अत्याचार करत आहे, माणसामाणसातील दऱ्या वाढवत आहे, मूठभर लोकांचेच जीवन सुसह्य करत आहे किंवा अनिष्ट गोष्टींची भोगलालसा निर्माण करत आहे तेच विज्ञान जर सुबुध्दपणे राबवले तर हेच प्रश्न सोडवायला तर मदत करीलच पण खरा आनंद, खरे सौख्य मिळवून द्यायला पण उपयोगी पडेल हा आशेचा किरणही मला ह्याच कवितात सापडला. ही संजीवनी सुरांच्या हाती द्यायची कां असुरांच्या हे मानवाने ठरवायचे आहे. दूरदर्शनच्या वापराचे उदाहरण देऊन कवीने हे पटवून दिले आहे. विशेषतः अमेरिकेत राहिल्यामुळे भारतीयांना एरवी जे मिळणार नाहीत ते पश्चिमी संस्कृतीचे बरेवाईट अनुभव, जसे की त्यांचा प्रयत्नवाद, विज्ञाननिष्ठा, प्रत्येक गोष्टीचे शास्त्र बनवण्याची अभ्यासू प्रवृत्ती, हरहुन्नरीपणा, भव्यतेचा ध्यास पण त्याचबरोबर भोगवाद, अनिर्बंध व्यक्तीस्वातंत्र्य, निसर्गाची लुटालुट, मी पलीकडे न बघण्याची स्वार्थी वृत्ती, आम्ही जेव्हा जवळून घेतो तेव्हा तर ह्या नीरक्षीरविवेकाची आवश्यकता अधिकच पटते.

श्री. प्रभाकर देवधरांची सामाजिक अन्यायाबद्दलची तसेच निसर्गाच्या विनाशाबद्दलची कळकळ, विज्ञानयुगाचे, माहितीयुगाचे खऱ्या अर्थाने स्वागत करून ते विज्ञान, ती माहिती, ते तंत्रज्ञान सामान्य माणसापर्यन्त पोचवण्याची धडपड, जीवनातला मिळमिळीतपणा टाकून ते उदात्त, उन्नत करण्याचा ध्यास, स्वतःच्या नाकर्तेपणावर पांघरूण घालण्यासाठी भूतकाळात रमण्याची शिकवण देणाऱ्या, दिशाभूल करणाऱ्या नेतृत्वाविरुध्द ओढलेले आसूड, क्रियाशील स्वप्नाळू वृत्ती आणि त्यांच्याच बरोबरीने केलेले आत्मचिंतन ह्या साऱ्याच गुणवैशिष्ठ्यांमुळे ह्या कवितांनी मला साद घातली व रूपांतराच्या माध्यमातून मी त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

माझ्याचप्रमाणे इतरही महाराष्ट्रीयांच्या, विशेषतः तरुण पिढीतल्या एखाद्या तरी मनात हा संग्रह जर सामाजिक बांधिलकीची, क्रियाशील स्वप्नशीलतेची, डोळस विज्ञानयुगाची ज्योत लावू शकला तर माझ्या मायमराठीचे ऋण अंशतः फेडल्याचे मला समाधान लाभेल .

ह्या कवितांना मराठी साज चढवण्याची संधी दिल्याबद्दल श्री. प्रभाकर देवधरांची मी मनःपूर्वक आभारी आहे.

श्री. मंगेश पाडगांवकरांनी ह्या अनुवादित कवितासंग्रहासाठी प्रास्ताविक लिहून देवधरांच्या मूळ कवितांचा तर गौरव केलाच आहे पण माझ्याही प्रयत्नाला अनुसर्जन म्हणून कौतुक केले आहे. ह्याहून मोठी पावती मी काय मागणार ? तसेच श्री. शांताबाई शेळक्यांनाही ह्या (मूळ व अनुवादित) कविता परिणामकारक व हृदयवेधी वाटल्या. मराठी साहित्यदिंडीबरोबर केवळ चार पावले चालणाऱ्या माझ्यासारख्या वारकरणीविषयी चार कौतुकाचे शब्द लिहून उत्तेजन दिल्याबद्दल मी ह्या दोन्हीही मान्यवरांची ऋणी आहे.

घरच्या भाकऱ्या भाजून झाल्यानंतर, मराठी भाषेच्या प्रेमाखातर, व परदेशात वाढणाऱ्या आमच्या मुलांपर्यन्त ती पोचावी ह्या कळकळीखातर पती श्री. वामन गानू ह्यांची ह्या लष्करच्या भाकऱ्या भाजण्यास ना नसते त्यांच्या व चि. सिध्दार्थ व विक्रम ह्या दोन्ही मुलांच्या सहकार्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

अनुराधा गानू

# छोटेसे टिपणः सरकारी नव्हे !

## मंगेश पाडगांवकर

श्री. प्रभाकर देवधर यांचा ‘ कॅपिटल पनिशमेंट ’ हा इंग्रजी कवितासंग्रह. या कवितासंग्रहाचा मराठी अनुवाद सौ. अनुराधा गानू यांनी केला आहे. ‘ अजब तुझे सरकार ’ या नावाने पुस्तकरुपाने प्रसिध्द होणाऱ्या या अनुवादित कवितासंग्रहासाठी मी प्रास्ताविक चार शब्द लिहावेत अशी विनंती मला करण्यात आली. प्रास्ताविक लिहिण्याचे मी मान्य केले. प्रभाकर देवधर यांचा १९९३ साली प्रसिध्द झालेला ‘ कॅपिटल पनिशमेंट ’ हा मूळ कवितासंग्रह मी या निमित्ताने प्रथमच वाचला.

श्री. प्रभाकर देवधर हे भारतातले एक नामवंत शास्त्रज्ञ आहेत. १९८५-१९८९ या काळात राजीव गांधी पंतप्रधान असताना श्री. देवधर हे इलेक्ट्रॉनिक आयोगाचे अध्यक्ष आणि इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानातील पंतप्रधानांचे सल्लागार होते.

असा हा शास्त्रज्ञ अचानक कवी कसा झाला ? श्री. देवधरांच्या कविता वाचण्यापूर्वी हा प्रश्न मला पडला होता. श्री. देवधरांच्या कविता मी वाचल्या, तेव्हा ह्या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले. देवधरांचे मन हे मूलतः एका अत्यंत संवेदनाशील आणि चिंतनशील अशा कवीचे मन आहे. असे हे मन त्यांच्या कवितांच्या ओळीओळीतून प्रकट होताना मला जाणवले. भारावून टाकणाऱ्या, अंतर्मुख करणाऱ्या देवधरांच्या या कविता हेच ते कां कवी झाले या प्रश्नाचे उत्तर आहे. पण हे सोपे उत्तर झाले

श्री देवधर कविता कां लिहू लागले याची कारणमीमांसा आणखी एका दृष्टिकोनातून करता येईल. अत्यंत उत्कट आणि खोल असा अनुभव जेव्हा व्यक्त होऊ पाहतो तेव्हा त्याला कवितेचे माध्यम अटळपणे स्वीकारावेसे वाटते. परंपरेने चालत आलेली वाल्मीकीची गोष्ट याची साक्ष आहे. मुळात वाल्मीकी हा काही कवी नव्हता. तपश्चर्येची साधना करणारा तो ऋषी होता. तो अचानक कवी कसा झाला ? काममोहित असे क्रौंच पक्ष्याचे जोडपे फांदीवर बसले होते. एका व्याधाने त्या क्रौंच जोडप्यापैकी नराला आपल्या बाणाने ठार केले. त्या निरपराध पक्ष्याची ही शिकार झालेली पाहून वाल्मीकीला अपार दुःख झाले, त्याचा संताप अनावर झाला आणि त्याने त्या व्याधाला शाप दिला. वाल्मीकीची ही शापवाणी, त्याच्या अपार करुणेतून निर्माण झालेली शापवाणी, कवितेतून व्यक्त झाली. या अत्यंत उत्कट, खोल अनुभवामुळे ऋषी वाल्मीकीचा कवी वाल्मीकी झाला. याचा अर्थच असा की, असा उत्कट, खोल अनुभव अचानक सर्जनशील होतो. या अनुभवाची सर्जनशील होण्याची प्रक्रिया हीच इथे कविता निर्माण होण्याची प्रक्रिया असते.

अशाच एका उत्कट, खोल अनुभवामुळे शास्त्रज्ञ प्रभाकर देवधर यांचे अचानक कवी प्रभाकर देवधरात रूपांतर झाले. १९८५ ते १९८९ या काळात श्री देवधर दिल्लीत असताना त्यांना आलेला हा अनुभव होता. इलेक्ट्रॉनिक आयोगाचे अध्यक्ष आणि राजीव गांधी यांचे तंत्रज्ञानातील सल्लागार असलेले देवधर या मोठया पदाच्या हपापापोटी दिल्लीला पोचलेले नव्हते. देवधर ध्येयवादाने झपाटले होते. तंत्रज्ञानाच्या मदतीने एकविसाव्या शतकात जगातील प्रगत देशांच्या बरोबरीचा देश म्हणून भारताला उभा करण्याच्या स्वप्नाने ते झपाटले होते. या स्वप्नाच्या बाबतीत राजीव गांधी यांच्याशी त्यांचा सूर जुळला होता – त्यांच्या निमंत्रणामुळेच त्यांनी या दिल्लीतील उच्च पदाचा स्वीकार केला होता. राजीव गांधींबरोबर देवधरांनी पाहिलेल्या या स्वप्नाचे काय झाले ? एका क्रूर व्याधाच्या हावऱ्या बाणाने हे सुंदर स्वप्न खाली कोसळले. या सुंदर स्वप्नाचा बळी घेणारा हा व्याध कोण होता? दिल्लीत ठाण मांडून बसलेले सत्तापिपासू राजकीय नेते आणि सरकारी नोकरशाही हाच तो व्याध होता. खरे म्हणजे, तो व्याध होता असे म्हणण्यापेक्षा ती व्याधांची फौज होती असे म्हणणेच योग्य आणि वास्तववादी होईल. क्रूर हावऱ्या व्याधाच्या बाणाने आपले निर्मळ सुंदर स्वप्न असे खाली कोसळलेले पाहून शास्त्रज्ञ प्रभाकर देवधरांच्या तोंडून जो आक्रोश बाहेर पडला तो कवितांचे रूप घेऊन. हा आक्रोश जर फक्त देवधरांच्याच मनाचा असता तर ती एक वैयक्तिक, खाजगी गोष्ट ठरली असती. पण ‘ कॅपिटल पनिशमेंट ’ हा देवधरांचा कवितासंग्रह वाचताना आपल्याला सतत जाणवत राहते की, हा आक्रोश केवळ प्रभाकर या एका व्यक्तीचा नाही, तो कोट्यावधी भारतीयांचा आक्रोश आहे. श्री. प्रभाकर देवधर यांच्याकडे अनेक अर्थांनी अभिव्यक्तीची शक्ती असल्यामुळे ते या कवितांच्या रूपाने हृदय विदीर्ण करणारा हा आक्रोश प्रकट करू शकले. पण या देशात अशी कोट्यावधी माणसे आहेत की, ज्यांना हा आपला आक्रोश असहाय्यपणे गिळून टाकावा लागतो आणि आातल्या आत रक्त ओकत मरणाची वाट पाहत जगण्याच्या तुरुंगात पिचावे लागते.

तंत्रविज्ञानाच्या मदतीने या देशातील सर्वसामान्य माणूस सुखी करावा हे प्रभाकर देवधर यांचे स्वप्न होते.

**संगणकाचे नवयुग आले,**
**तंत्रज्ञानहि प्रतिदिनि बदले,**
**दिसले का पण शेतकऱ्याच्या**
**खोपटातले चित्र बदलले ?**

याचे नकारात्मक उत्तर धेयवादाने दिल्लीला जाऊन आपले कर्तृत्व पणाला लावणाऱ्या शास्त्रज्ञ प्रभाकर देवधरांना द्यावे लागते आणि त्यामुळे

**जीवन सुसह्य करते त्याला**
**आपण म्हणतो खरेच शिक्षण,**
**जाळायाचे का हे ज्ञान**
**जे न बदलते असले चित्रण ?**

असे उद्‌वेगाचे उद्‌गार त्यांच्या तोंडून बाहेर पडतात. या स्वप्नाच्या पूर्तीसाठी अनेक योजना देवधरांनी आखल्या होत्या .

**वरती फाईली, खालती फाईली,**
**जिकडे तिकडे फाईलीच फाईली,**
**इतकं करुन योजना मात्र**
**तिथेच होती अडकुन राहिली**

अशा या देवधरांच्या सर्व योजना बघता बघता या फाईलींनी त्यांच्या डोळ्यांदेखत गिळून टाकल्या ‘ कर व जकाती ’ या कवितेत लघुउद्योगाच्या क्षेत्रात धडपड करुन उभा राहू पाहणारा तरुण मुलगा सरकारी क्षेत्रातील लाचखोरी या महाउद्योगामुळे हैराण होतो. हा भ्रष्टाचार त्या ध्येयवादी तरुण मुलाला सहन होत नाही. तो आपले दुःख, चीड बापाकडे व्यक्त करतो. बाप अर्थातच अनेक सरकारी पावसाळे पाहिलेला, अनुभवी शहाणा असतो. तो लाचेचे हप्ते दे असे मुलाला सांगतो .

**बाप म्हणे मज वेडा का तू ?**
**कां न भरिसि रे हे हप्ते ?**
**नशीब आपुले म्हणून त्यांनी**
**मागितले ना पत्नीते**

मुलाला योग्य तो मार्ग दाखवणे हे कर्तव्य बाप अशा रितीने पार पाडतो.

दिल्लीत उच्च पदावर काम करणारे देवधर या भ्रष्ट आणि शोषण करणाऱ्या नोकरशाही प्रमाणेच भारताचे भाग्यविधाते असलेल्या राजकीय नेत्यांना अगदी जवळून पाहतात.

**गेंड्याची कातडी पांघरलेले राजकारणी**
**ह्यांना काय म्हणावे ?**
**निर्लज्ज, लाचार का कारस्थानी ?**
**टोपी फिरवणारे विदूषक ?**

**का जनतेला लुटणारे तस्कर, चोर ?**
**प्रेताचे लचके तोडणारी गिधाडे ?**
**का असहायांना ओलीस ठेवणारे हरामखोर ?**

प्रश्नांच्या या चक्रव्यूहातून बाहेर पडणे शक्य नाही याची जाणीव इथे देवधरांना व्याकूळ करते.

समाजातला दंभ, स्वार्थ, खोटेपणा पाहून संतपदाला पोचलेला तुकारामही संतप्त होतो. आपल्या शब्दांची रत्ने तो अशा वेळी क्षणभर बाजूला ठेवतो आणि ' शब्दांचीच यत्न शस्त्रे करू ' अशी प्रतिज्ञा करतो. अशा वेळी तुकारामाची फटकळ, परखड वाणी ' तुका म्हणे ऐशा नरा, मोजून भाराव्या पैजारा ' हे रूप धारण करते. श्री. प्रभाकर देवधर यांनाही शब्दांची शस्त्रे होतात याची जाणीव आहे.

**शब्दांना ह्या शस्त्राहुनही**
**धार तेज ही असे**

या त्यांच्या ओळी या जाणिवेची साक्ष देतात. समाजातला भ्रष्टाचार, सत्तेचे कुटिल राजकारण आणि लोकांची लूट करणारी नोकरशाही देवधरांना शब्दांची शस्त्रे करायला भाग पाडते.

**प्रेमिजनांचे गुंजन**
**अथवा ममतेची माधुरी**
**आशीर्वचनामधुन बरसती**
**सद्भावांच्या सरी**

ही शब्दांची शक्ती श्री. देवधर जाणतात. पण पाच वर्षे दिल्लीत राहून घेतलेला अनुभव त्यांना शब्दांची शस्त्रे करायला भाग पाडतो. ज्यांच्या कवितेतल्या शब्दांनी प्रेमाने गळयात फुलांचा हार घालावा ते शब्द प्रहार करू लागतात, भ्रष्टाचारावर, शोषणावर, सत्तेच्या निर्लज्ज राजकारणावर प्रहार करू लागतात.

**कुठलं राष्ट्र ? फुलणं काय ?**
**कुणाचा बळी ? बरळता काय ?**
**अहो हव्या त्या खुर्चीवर हवा तो ठोकळा**
**एवढंच माफियाला ठाऊक हाय**
**संघटित बलशाली राष्ट्र**

**ही कल्पनाच आता विसरायला हवी,**
**फुलु शकणाऱ्या उमद्या राष्ट्राची**
**शेळी वेदीवर चढायला हवी**

अशी उपरोधाची विलक्षण धार या शब्दांना येते. शब्दांचे हे शस्त्र एकाच वेळी प्रहारही करते आणि अंतर्मुख करून विचारही करायला लावते. यांचे कारण असे की, देवधरांच्या या शस्त्रामागे हिंसा उभी नाही. या शस्त्रांमागे करुणा उभी आहे. ज्या प्रवृत्तीवर देवधर प्रहार करीत आहेत त्या प्रवृत्ती हिंसेच्या आहेत. देवधरांची करुणा या भ्रष्ट हिंसक प्रवृत्तींवर ' शब्दांचीच यत्न शस्त्रे ' उगारुन उभी आहे.

**अण्वस्त्रांचा सुसाट मारा**
**करतो धरतीवरती,**
**अविचाराने जंगल तोडुन**
**विवस्त्र करतो पुरती**

अशी ही भ्रष्ट हिंसक प्रवृत्ती माणसालाच लुटून थांबत नाही, ती निसर्गाचीही लूट करते आहे

**कधी लढे न्यायासाठी,**
**कधी कुढे ममतेसाठी,**
**कधी रडे प्रेमासाठी,**
**कधी भांडे समतेसाठी**

असे मन लाभलेले प्रभाकर देवधर आपले हे करुणेचे, माणूसकीचे गाणे घेऊन आता मराठी रसिकांपुढे येत आहेत.

श्री. प्रभाकर देवधर यांना मराठी रसिकांपुढे आणण्याचे श्रेय गेली पंचवीस वर्षे अमेरिकेत असलेल्या सौ. अनुराधा गानू यांचे आहे. इतका दीर्घ काळ महाराष्ट्रापासून इतक्या दूर परदेशात वास्तव्य केल्यामुळे सौ. अनुराधा गानू यांचे मराठी भाषेवरचे प्रेम क्षीण झाले नाही, उलट ते कितीतरी पटींनी वाढले. सौ. अनुराधा गानू या आर्थिक सल्लागार म्हणून काम करतात. या व्यावसायिक क्षेत्रात पैशांचा हिशोब करण्यात इतका वेळ जातो की, कवितेतल्या शब्दांचा – मात्रांचा हिशोब करणे शक्यच नसते कवितेवर प्रेम करणे म्हणजे घरचे खाऊन लष्करच्या भाकऱ्या भाजण्याचा उद्योग सौ. अनुराधा गानू
ज्या आर्थिक – औद्योगिक क्षेत्रात काम करतात तिथे कवींच्या या उद्योगाला मान्यता नाही पण सौ. अनुराधा गानू यांच्या मनाचे सामर्थ्यच वेगळे. त्यांनी कविता लिहिण्याच्या

आपल्या लेखणीने एक स्पष्ट रेषा आखून दिली आणि धनदांडग्या औद्योगिक जगाला या रेषेच्या पलिकडे उभे केले. ही रेषा ओलांडून या जगाला आपल्या कवितेच्या जगात त्यांनी पाऊलही टाकू दिले नाही. श्री प्रभाकर देवधर यांचा ' कॅपिटल पनिशमेंट ' हा इंग्रजीत लिहिलेल्या कवितांचा संग्रह सौ. अनुराधा गानू यांच्या वाचनात आला. या कवितांनी त्यांना भारून टाकले. देवधरांच्या या कवितांतून व्यक्त होणारा जीवनानुभव सौ. अनुराधा गानू यांच्या भावविश्वाचाच एक भाग बनला. स्वाभाविकच, या कवितांचे मराठीत भाषांतर करावे असे त्यांना उत्कटपणे वाटले.

कुठल्याही चांगल्या कवितेचा एका भाषेतून दुसऱ्या भाषेत अनुवाद करणे हे अतिशय कठीण काम आहे. कवितेच्या शब्दांचा अर्थ एका भाषेतून दुसऱ्या भाषेत सांगणे म्हणजे कवितेचा अनुवाद करणे असा बऱ्याच लोकांचा – अनुवाद करणाऱ्यांचाही – गैरसमज असतो. शब्दांचा अर्थ हा कवितेचा एक घटक झाला. केवळ हा शब्दार्थ म्हणजे कवितेचा समग्र अनुभव नव्हे. ' आनंदी आनंद गडे, इकडे, तिकडे चोहीकडे ' ही बालकवींची ओळ : तिचा अर्थ समजला म्हणजे ती ओळ समजली असे म्हणता येईल काय ? इकडे, तिकडे, चोहीकडे आनंद भरलेला आहे या तिच्या शब्दार्थात ही संपूर्ण ओळ सामावली गेली आहे काय ? मुळीच नाही, असेच या प्रश्नाचे उत्तर आहे. या शब्दांचा नाद, त्यांची लय, विशिष्ट अक्षरांचा अनुप्रास, त्यांच्या मागची भाववृत्ती, अनुभव घेण्याची कवीची विशिष्ठ लकब असे कितीतरी घटक आहेत की जे एकात्म होऊन या कवितेच्या ओळीची समग्रता निर्माण करीत असतात.

कविता ही अन्वय लावुन गुंफलेली शब्दार्थांची माळ नव्हे, कविता हा एक समग्र अनुभव आहे याचे तल्लख भान सौ. अनुराधा गानू यांना आहे. हे भान असल्यामुळे, देवधरांच्या कवितांचा त्यांनी केलेला अनुवाद हा शब्दांच्या यांत्रिक पातळीवर न राहता, केवळ शब्दार्थात अडकून न पडता समग्र अनुभूतीशी एकात्म होऊन येतो. सौ. अनुराधा गानू यांनी देवधरांच्या ' कॅपिटल पनिशमेंट ' या कवितासंग्रहाचा केलेला हा अनुवाद केवळ अनुवाद राहिला नसून तो अनुसर्जन बनला आहे. या अनुसर्जनामुळेच प्रभाकर देवधर यांच्या या कवितांना खऱ्या अर्थाने न्याय मिळाला आहे. ' अजब तुझे सरकार ' या सुंदर, संवेदनाशील अनुसर्जनाबद्दल सौ. अनुराधा गानू यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

श्री. प्रभाकर देवधर यांच्या या कविता मराठी कवितेवर प्रेम करणाऱ्या रसिकांना आवडतील असा मला विश्वास वाटतो.



# अजब तुझे सरकार : एक अवलोकन

## शांता शेळके

श्री प्रभाकर देवधर हे माझ्या भावाचे स्नेही. पण त्याहीपेक्षा त्याची खरी आणि विषेश ओळख द्यायची म्हणजे भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कारकिर्दीत ते राजीवचे इलेक्ट्रॉनिक्स विषयातील सल्लागार आणि त्याचे निकटवर्ती स्नेही होते. एकोणीसशे पंचाऐंशी सालापासुन तो राजीव गांधी यांच्या राजवटीच्या अखेरीपर्यंत म्हणजे एकोणीसशे एकुणनव्वदच्या डिसेंबरपर्यंत ते भारताची राजधानी दिल्ली इथे राहात होते. इलेक्ट्रॉनिक्स कमिशनचे अध्यक्ष म्हणुनही ते काम पहात होते.

दिल्ली इथल्या आपल्या वास्तव्यात देवधर यांनी तिथल्या अनेक राजकीय घडामोडी पाहिल्या. सरकार नावाच्या बिनचेहऱ्यांच्या हृदयशून्य आणि चाकोरीबध्द यंत्रणेचे त्यांनी अगदी जवळून आणि बारकाईने अवलोकन केले. त्या बरोबर ज्यांना आपण ब्यूरोक्रॅट्स् म्हणतो त्या सत्ताधारी हुकुमशहांशीही त्याचा निकट संपर्क आला. स्वतः देवधर हे एक अत्यंत बुध्दिमान पण त्याबरोबरच अतिशय संवेदनाक्षम असे गृहस्थ आहेत. भारताच्या राजधानीचे इतके जवळून दर्शन घेण्याची, त्याबरोबरच आपल्या बिशिष्ठ अधिकारपदामुळे साऱ्या शासनाचे अंतरंग दुर्मिळ अशी संधी त्यांना लाभली. दिल्लीमधील वास्तव्यात जे बरेवाईट अनुभव स्वतःला आले त्यांवर देवधर यांनी इंग्रजीतून कवितालेखन केले आणि तो कवितासंग्रह 'कॅपिटल पनिशमेंट' या अत्यंत मार्मिक आणि अन्वर्थक शीर्षकाने त्यांनी प्रसिध्द केला.

'अजब तुझे सरकार' हा त्या संग्रहाचा मराठी अनुवाद अनुराधा गानू ह्यानी केला आहे.

या मराठी अनुवादाबद्दल थोडेसे लिहिणे आवश्यक आहे. अनुवादा विषयी अनेकांचे गैरसमज असतात. कित्येकांना अनुवाद करणे ही कलादृष्टया दुय्यम गोष्ट वाटते. तर काहींना अनुवाद ही शब्दाला प्रतिशब्द ठेवून करावयाची एक कोरडी कारागिरी वाटते. या दोन्ही समजुती आडाणीपणाच्या द्योतक आहेत. मूळच्या कलाकृतीचा आशय जाणून, त्याच्याशी समरस होऊन जेव्हा अनुवादक आपला भाषेला साजेळ असा अनुवाद करतो तेव्हा त्याला कलादृष्टया स्वतंत्र निर्मितीचे मुल्य प्राप्त होते. त्या दृष्टीने `कॅपिटल पनिशमेंट' मधला मूळच्या इंग्रजी कवितांचा श्रीमती अनुराधा गानू यांनी केलेला मराठी अनुवाद यशस्वी उतरला आहे असे म्हणावयास हवे. मराठीचे भाषिक वळण कायम राखुन हा अनुवाद त्यांनी केला आहे. ही विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे.

मूळ इंग्रजी कविता आणि त्यांचा मराठी अनुवाद दोन्हीही मराठी वाचकांना आवडतील. त्यांतले भेदक सत्य त्यांना अस्वस्थ करील.

'वाराङ् गनेव नृपनीतिरनेकरूपा' असे एक संस्कृत वचन आहे. देवधर यांच्या कविता वाचताना त्याचे मला वारंवार स्मरण होत होते.

'अजब तुझे सरकार' मधले मराठी अनुवाद वाचताना देवधर यांच्या कवितांचे अंतरंग माझ्या मनात अधिक उत्कटपणे उलगडत गेले. नोकरशाही, सरकारी यंत्रणा, तिथले पदाधिकारी आणि तिथे चालणारे अनन्वित अत्याचार यांची इतकी परखड चिकित्सा दुसऱ्या कुणी केलेली निदान माझ्या तरी बघण्यात नाही. आपल्या इंग्रजी संकलनाच्या प्रस्तावनेत देवधर म्हणतात, देशाला स्वातंत्र्य मिळुन पंचेचाळीस वर्षे उलटून गेली तरी सर्व सामान्य जनता अजून नोकरशाहीच्या बेडयांनीच करकचून आवळलेली आहे. राजधानी आणि देशातले लोक यांच्यामध्ये अद्यापही कसली जवळीक किंवा एकोपा नाही. जुलमी सत्ताधारी, लाचखाऊ अधिकारी आणि मग्रूर हुकुमशहा हे जनतेला हवे तसे पिळत आहे. प्रत्येक जण आपली खुर्ची सांभाळत आपली तुंबडी भरतो आहे.

पुढल्या पिढीने ज्यांच्याकडे आशेने, विश्वासाने आणि आदराने बघावे असा कुणी नेताही नाही. प्रत्येक जण आत्मरत, आत्मसंतुष्ट आणि केवळ सत्तेसाठी हपापलेला आहे. दुःखाची गोष्ट ही की, या अवस्थेत कसलाही बदल होत नाही. परिस्थिती आहे तशीच आहे. देवधर यांचे हे मनोगत वाचले की कोणत्या पोटतिडिकीने आणि व्यथावेदनेने त्यांनी आपल्या कविता लिहिल्या आहेत त्याची वाचकांना कल्पना येऊ शकेल. यांतल्या अनेक कवितांची केवळ शीर्षके सुध्दा बोलकी आहेत. 'फाईल प्रतिक्षा', 'कर व जकाती', 'मेगाकॉर्प', 'उदे उदे ग नोकरशाही', 'कशासाठी, खुर्चीसाठी !' या शीर्षकावरून आपला राज्यकारभार कसा सुस्त, कर्तव्याची लवमात्र जाण नसलेला आणि सामान्य जनतेच्या हिताची किंवा भाग्याची अजिबात पर्वा न करणारा आहे ते ध्यानात येते. उदाहरणार्थ. खेडे आणि शहर यांत पडलेल्या प्रचंड दरीचे वर्णन करताना कवी म्हणतो –

**खेडयापाडयांमधले जीवन**
**शहरवासिया कसे कळावे ?**
**एका राष्ट्राचे दो पाईक**
**दोघांनाही मुळी न ठावे**
**काळाच्या जणु दोन स्तरांवर**
**दोन घटक हे स्थिरावलेले**
**नवतंत्रांनी, नवमंत्रांनी**
**मुळी न त्यांना जवळ आणिले**

विज्ञानाची प्रगती होत आहे, नवनवीन तंत्र विकसित होत आहेत पण खेडयांपाडयातल्या जनतेला त्यांची काहीही चाहून सुध्दा लागलेली नाही. ती आहे तिथेच, अडाणी, मूढ, अगतिक आहे हे कवी इथे सांगतो. नवनव्या योजना निघतात. अधिकारी उत्साहाने त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर करतात, वरवर त्याचे कौतुक आणि स्वागत होते, प्रत्यक्षात मात्र त्या मुळीच अमलात आणल्या जात नाहीत. सरकारी कचेऱ्यांतले फाइलींचे ढिगारे मात्र वाढत जातात. याचे उपरोधपूर्ण चित्र फाइल प्रतिक्षा या कवितेत कवी रंगवतो. कर व जकाती कवितेत लांचखाऊपणाला कसा भर आला हे कवी पुढील शब्दांत सांगतो.

**संतापाने थरथरलो मी**
**मागे जेव्हा तो मज लांच..**
**लाज सोडनी म्हणे कसा तो**
**जगू कसा मी सांग मला ?**
**गरजा भागति पसारातुनी**
**लांच हवी मज चैनीला**
**खाजव माझी पाठ जरा तू**
**मीहि खाजविन पाठ तुझी**
**तपासण्यांतून सगळ्या सुटशिल**
**तत्व जाऊ दे चुलिमाजी**

'आबादी आबाद' या कवितेत समोरच्या दाहक वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून सर्व काही ठीक आहे अशी आत्मवंचना करणाऱ्या अधिकाऱ्यांचे चित्र रंगवले आहे. हाही आपला नोकरशाहीचा एक विषेश आहे.
'अजब तुझे सरकार' मध्ये शासनातील अनेक अपप्रवृत्ती कवीने दाखवून दिल्या आहेत. पण येवढाच काही या कवितांचा विषय नाही. इतर ही अनेक वास्तवांचा कवीने इथे परामर्श घेतलेला आहे. 'दुरदर्शन'चा प्रसार ही आज सामान्य समंजस लोकांच्या चिंतेची बाब झाली आहे. उणीव आहे जाणिवांची या कवितेत दूरदर्शन दुष्परिणाम सांगताना कवी म्हणतो..

**मस्त जेवुनी सुस्त जाहले**
**टीव्ही पुढती सगळे जमले**
**नकोत चर्चा, नको विचारही**
**अक्कलखाती कुलुप लावले**

**घराघरांमधला संवाद**
**आज संपला आहे सगळा**
**नशा चढविती विविध वाहिन्या**
**ध्यास आज न कुणा वेगळा**

दिल्लीचे लोढणे या कवितेत कवीने राजकारणात केवळ कागदी सुधारणा करणारे सरकारी अधिकारी आणि प्रत्यक्षात अगदी वेगळे जीवन जगणारी, अगदी वेगळ्या प्रश्नांना तोंड देणारी खेडयापाडयातली कृषिक जनता यांच्यात पडत चाललेले अंतर कवीने अधोरेखित केले आहे. पुढील ओळी त्या दृष्टीने फार अर्थपूर्ण वाटतात.

**जनतेच्या जिवावर**
**चालतोय् हा देश**
**पुढाऱ्यांचे नुसते**
**पोकळ आवेश**
**शेतांतून चाला**
**अनवाणी पायी**
**बोलतील मग तुमच्याशी**
**नांगर नि गायी**
**हरीत क्रांती ही**
**शेतातून घडे**
**दिल्लीला अजून**
**उमज न पडे**

'अजब तुझे सरकार' मधल्या कवितामधून या प्रकारची परखड टीका कवीने केलेली आढळते. पण केवळ टीका, चिडचिड, हताशपणा येवढेच या कवितांचे विषय आहेत असे नाही. इथे काही कवितांमधून प्रेमभावनेची तरल चित्रे रंगवलेली दिसतात. 'गर्वाचा मी गौरव करतो' सारखी एखादी कविता माणसामधला दुर्दम्य आशावादाचा आणि त्याच्या अपराजित इच्छाशक्तीचा सुंदर प्रत्यय आणून देते. मुखवटे सारखी कविता एकूणच मानवजातीचे चित्र रंगवते.

या संग्रहातील सर्वात हृद्य वाटलेल्या कविता माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्यावरच्या आहेत, पृथ्वीवर अवतरलेला हा इंद्रपुरीचा राजपुत्र. नियतीने त्याच्यावर राज्य लादले. नकळत तो सोन्याच्या पिंजऱ्यात बंदिवान झाला. अनेकानी त्याला कठपुतलीसारखे नाचवण्याचा प्रयत्न केला. मतलबी निकटवर्ती सल्लागारांनी व्यवहारातली धूर्तता त्याला शिकवावी म्हणून डावपेच आखले आणि शेवटी शेक्सपीयरच्या शोकांतितेच शोभून दिसेल अशी या देखण्या, गुणी, संवेदनाशील आणि सद्‌भावनायुक्त राजपुरूषाची अखेर झाली. देवधरांनी राजीव गांधीवर मोजक्याच कविता लिहिल्या आहेत. पण त्यांतून त्यांचे फार जिवंत आणि प्रत्ययकारी चित्र रेखाटण्यात ते यशस्वी झाले आहेत.

कॅपिटल पनिशमेंट मधला मूळ इंग्रजी कविता आणि अजब तुझे सरकार मधील त्यांचा मराठी अनुवाद ही दोन्ही पुस्तके मी वाचली. निखळ कलात्मक कवितांची कसोटी या कवितांना लावणे बरोबर होणार नाही, तो कवीचा उद्देशही नाही. पण एखादी बुध्दिमान आणि संवेदनाक्षम माणूस जेव्हा एका अवाढव्य यंत्रणेचा प्रेक्षक होतो, तिथली गुंतागुंत, तिथला चक्रांचे एकात एक गुंतून फिरणे आणि त्यातून निष्पन्न होणारे अनर्थ जेव्हा तो बघतो तेव्हा त्याची कोणती प्रतिक्रिया होते यांचे फार चांगले दर्शन या कवितांमधून घडते. निदान मला तरी ते घडले. अशा या परिणामकारक आणि हृदयवेधी कवितांबद्दल कवीचे मनःपूर्वक अभिनंदन करावेसे वाटते. त्यासाठी हे चार शब्द लिहिले आहेत.

## मखख दिल्ली


१ ज्ञानास आव्हान ........ २
२ दूरदर्शन कां अदूरदृष्टी ? ........ ४
३ उणीव आहे जाणिवांची ........ ६
४ फाईल प्रतीक्षा ........ ८
५ कर व जकाती ........ १२
६ आबादीआबाद ........ १४
७ मेगॅकॉर्प ........ १६
८ डॉलर भूषण ........ १८
९ कशासाठी ? खुर्चीसाठी ........ २२
१० उदे उदे ग नोकरशाही... ........ २५
११ मेरा भारत महान ........ २७
१२ दिल्लीचं लोढणं ........ २९




## हरवले अन् गवसले ना


१३ पण कसं ?... ........ ३४
१४ इंद्रधनूचा पूल ........ ३७
१५ गेले तुझ्यासवे ते ........ ३८
१६ हास्यलेणं ........ ४०


## जीवनदृष्टी


१७ क्षणभंगुर ........ ४४
१८ दैनंदिन शिक्षण ........ ४५
१९ मुखवटे ........ ४७
२० गर्वाचा मी गौरव करतो.. ........ ४९
२१ वाग्बाण कां वाक्फुले ? ........ ५१
२२ स्वप्नांचा सौदागर ........ ५३
२३ अप्रूप ........ ५५
२४ नात्यांच्या ह्या रेशिमगाठी ........ ५७


## अन्तर्मुख


२५ विदूषक ........ ६०
२६ वेडा पीर ........ ६१
२७ अक्कल ........ ६२
२८ आयुष्याचा हिशेब ........ ६४
२९ पडछाया ........ ६६
३० मी एक रोबो ........ ६८


## राजीवनामा


३० वारसा ........ ७२
३१ बालपण ........ ७४
३२ नियतीचे फासे ........ ७६
३३ बंदिवान ........ ७८
३४ अखंड यज्ञ ........ ८०
३५ शोध चालूच आह ........ ८१
३६ निकटवर्ती सल्लागार ........ ८४
३७ उत्तिष्ठत जागृत ........ ८६
३८ श्री विष्णुस आवाहन... ........ ८८


## शोध


३९ कोडं ........ ९२
४० फ्लॅश बॅक ........ ९३
४१ पटावरील प्यादी ........ ९४
४२ प्रभु कृपा ........ ९५

# मखव दिल्ली





## ज्ञानास आव्हान

तपशीलांची खोगिरभरती
मिळे न ज्यातुन काही माहिती
हवी कशाला तुमच्या माझ्या
डोक्याला मग पीडा नसती ?

हवी माहिती ज्ञानासाठी
ज्ञान हवे हे कामासाठी
बुध्दीवरची धूळ जळमटे
पुसुन झळाळी देण्यासाठी

हृदय कळवळे एलियटचे
काय प्रयोजन ह्या जगण्याचे ?
प्राणाविण ज्या श्वास मालिका
जीवन का त्या म्हणावयाचे ?

संगणकाचे नवयुग आले
तंत्रज्ञानही प्रतिदिनी बदले
दिसले कां पण शेतकऱ्याच्या
खोपटातले चित्र बदलले ?

लोहार, चांभार, सुतार, विणकर
गवंडी, गवळी, शिंपी, प्लंबर
नवतंत्राचा वापर करुनी
किती तयातील झाले गब्बर ?



शतकामागुन शतके गेली
राज्यामागुन राज्ये गेली
दिसली कां पण खेडयामध्ये
कुठे जादुची कांडी फिरली ?

खेडयापाडयामधले जीवन
शहरवासिया कसे कळावे ?
एकच राष्ट्राचे दो पाईक
दोघांनाही मुळी न ठावे

काळाच्या जणु दोन स्तरांवर
दोन घटक हे स्थिरावलेले
नवतंत्रांनी, नवमंत्रांनी
मुळी न त्यांना जवळ आणिले

आजवरी ह्या नवतंत्राने
काय दिले ह्या समाज देशा
पढीक मूर्ख, फसव्या गरजा
पश्चिम संस्कृती, भाषा, वेषा

जीवन सुसह्य करते त्याला
आपण म्हणतो खरेच शिक्षण
जाळायाचे का हे ज्ञान
जे न बदलते असले चित्रण ?





## दूरदर्शन कां अदूरदृ-ष्टी ?□

परमेशाहुन महान शक्ती
आज कोणती जाणा
कुठे चालला देवदर्शना ?
दूरदर्शना या ना !

कृपा करी कां कोप करी
हे त्याला कसे कळावे ?
किल्लीच्या बाहुलीपरी तो
फिरवू तसाच धावे

निर्जिव डबडा म्हणून कोणी
गाफिल राहू नका
नकळत ताबा घेई मनाचा
धोका विसरू नका !

कपडालत्ता, विचार, गरजा
जाणिव तशाच सुविधा
सगळे ठरवी तुमच्यासाठी
उगाच कां व्हा व्दिधा ?

कल्पक आणि कलात्मक कुणी
शक्ति ओळखे याची

पण अरे अरे.....

नोकरशाहित संधि गुणांना
कुठुनी मिळावयाची ?



पकड मनाची कशा रितीने
घेतिल आजच्या प्रतिमा ?
बाळबोध चित्रणे नाहीतर
निसुगपणाची सीमा

कोटि जीवने उजळायाची
शक्ति ज्यामधे आहे
राखायासी मुठभर खुर्च्या
मुकाट राबत आहे !

पैशासाठी ह्या वापरणे
जरी असे मोक्याचे
सत्तेसाठी ह्या वापरणे
आणखीच धोक्याचे

स्वार्थासाठी ह्या वापरणे
हे अविचारी आहे
कसा उलटल्यावाचुन राहिल
शस्त्र दुधारी आहे !

मंजुषेत ह्या असे कोंडली
दिव्य अनोखी शक्ती
कशा कारणी वापरायची
असे आमुच्या हाती !



## उणीव आहे जाणिवांची

मस्त जेऊनी सुस्त जाहले
टीव्ही पुढती सगळे जमले
नकोत चर्चा नको विचारही
अक्कलखाती कुलुप लावले

घराघरांमधला संवाद
आज संपला आहे सगळा
नशा चढविती विविध वाहिन्या
ध्यास आज ना कुणा वेगळा

मीही वेडा म्हणुन म्हणालो
टीव्हीमधुनी शिक्षण द्यावे
सर्व म्हणाले कोण मूर्ख हा
ह्याला आधी गप्प करावे

चिवट तसा मी पुन्हा म्हणालो
साक्षरतेचा प्रसार व्हावा
नेऊ लागले ठाण्याला मग
उगाच वाटे म्हणतिल वा वा !

शेतकरी अन् कामकऱ्यांची
कां व्हावी ही अशी वंचना
टीव्हीमधल्या प्रशिक्षणातुन
स्वाधिन करता येईल त्यांना !



श्रीमंतांची सुस्थिर दुनिया
बुध्दिमंत हे मोडित निघती
कशी कळावी त्या दोघांना
टीव्हीमधली अफाट शक्ती ?

असे माहिती आज सोबती
कमतरता ना सामुग्रीची
तरिही रखडे देश आमुचा
उणीव आहे जाणिवांची !



## फाईल प्रतीक्षा

झकास आहे तुमची कल्पना नवी
झपाट्याने अंमलात आणायला हवी
बॉसने दिली पाठीवर थाप
स्तुती तर केली वारेमाप

झपाटुन सगळे कामाला लागले
घाण्याला जसे बैलच जुंपले
तपशिल, माहिती, फॅक्टस् ॲण्ड फिगर्स
काही न सोडले करण्याबिगर



सुंदर राबवण्याजोगी योजना
ऐटीत सादर केली त्यांना
पुन्हा उधळली स्तुति सुमने
हरखुन गेली आमची मने
जमिनिवर नव्हते आमचे पाय
नोकरशाहित आणखी हवंय् काय ?

हळुहळु खाक्या ध्यानात आला
नोकरशाहीचा इंगा कळला

फाईलीचे हे विश्व नवे
जवळुन तुम्ही पहायला हवे
फाईल, फाईल, फाईल अवे !!

हसुन दिली सचिवा हाती
वाटलं आता जाईल पुढती
पण तो तर मागे नवी माहिती !
तीही आमचे लोक पुरवती



त्यावर सरले अनेक मास
तरी न संपला सासुरवास

वरती फाईली, खालती फाईली
जिकडे तिकडे फाईलीच फाईली
इतकं करुन योजना मात्र
तिथेच होती अडकुन राहिली !

राग आला, संताप झाला
चीड तर अगदी अनावर झाली
निषेध केला, तक्रार नोंदली
तरी न फाईल जराहि हलली

फाईलीचे हे विश्व नवे
जवळुन तुम्ही पहायला हवे
फाईल, फाईल फाईल अवे !!

उत्साहाला हाणुन पाडा सहनशक्तिला
झोडुन काढा
आठवणसुध्दा शिळी होऊ द्या
तंत्रज्ञानही जुने होऊ द्या
फारच टुरटुर करणाऱ्याची
टिबकटूला बदली होऊ द्या !!

अशा रितीने टळले विघ्न
उत्तर कसलं ? कुठला प्रश्न ?
लंगडत चालतोय् वाटतं देश ?
अरेरे  फाईलींना चढवा नवीन वेष !!





## कर व जकाती

नको कुणाची ताबेदारी
म्हणुन उघडला लघुउद्योग
पण काय सांगु दुर्दैवी योग ?
गिऱ्हाईकांच्यापेक्षा माझा
इन्स्पेक्टरांच्याशिच संयोग !

एक तपासे विक्रीकर तर
दुसरा पाही प्राप्तिकर
प्राप्ती करण्या वेळ दिला तर
भरीन ना कर प्राप्तिवर ?

संतापाने थरथरलो मी
मागे जेव्हा तो मज लाच
दिली नाही तर कळे न मजला
कस संपवू मी हा जाच



लाज सोडुनी म्हणे कसा तो
जगू कसा मी सांग मला
गरजा भागति पगारातुनी
लाच हवी मज चैनीला !

खाजव माझी पाठ जरा तू
मीही खाजविन पाठ तुझी
तपासण्यातुन सगळ्या सुटशिल
तत्व जाऊ दे चुलिमाजी

तत्वासाठी भांडू लागलो
सहन होईना भ्रष्टाचार
सगळे म्हणले कशास करिसी
अव्यापारेषु व्यापार !

बाप म्हणे मज वेडा कां तू ?
कां न भरिसी रे हे हप्ते ?
नशीब आपुले म्हणून त्यांनी
मागितले ना पत्नीते !

कर जोडोनी भरू सर्व कर
नंतर करुया मुख्य विचार
वाढवायचे उत्पादन कां
बंद करूया आपुले दार ?



# आबादीआबाद

साहेब ना कुठे कशाचि ददात
सर्वत्र आहे आबादीआबाद !

समाधान वाहतय् दुथडी भरुन
महागाईदेखिल बसलिय् रुसुन

ऐकलित का कुठे हुंडयाची कथा ?
मोडित निघालिय् सतीची प्रथा

जातियतेला कुठे न वाव
वाढिस लागलाय् बंधुत्वभाव

साहेब जरा एक करता ना सही ?
धरायला घ्या खाली ही वही

विशेष असं काही
मागायचं नाही
आयात परवान्यासाठी
फक्त तुमची ग्वाही
घरचंच काम आहे
तसं लांबचं कुणी नाही !



आईच्या नातीची मावसजाऊ
आणि हा दुसरा तर आपल्या
चिंत्याचा भाऊ !

आणखी एक सांगायचं राहिलं...

साहेब व्हाच तुम्ही
निर्धास्त आज
गुंडुस्वामीला हलवला
साल्याला चढलाय् माज

म्हटलं आयातिंनी होईल
देशाचा फायदा
तर तयार नाही बेटा
वाकवायला कायदा

बाकी काय ? .....

साहेब ना कुठे कशाचि ददात
सर्वत्र आहे आबादीआबाद !





## मेर्गॅकॉर्प

दिल्लीतिल एक विराट यंत्रणा
मेर्गॅकॉर्प हे नांव जिचे
मगरमिठी ह्या राजधानीवर
एवढेच् भांडवल आहे तिचे

बोर्डावरती आहेत कोण ?
उच्चपदाचे अधिकारी
दिवटी पोरे श्रीमंतांची
तसेच लुच्चे व्यापारी

भागधारकहि असती कोण ?
मध्य स्तरावरचे बाबू
पु. लंच्या अतिविशाल महिला
तसेच लुब्रे हे खाबू

कमिशन एजंट आणखी कोण ?
नाजुक सुंदर ह्या तरुणी
तंत्रज्ञानामधले प्रवीण
निवृत्तितले सेनानी

इतकी सत्ता हाती असता
मोह कुणा ना होणार ?
बंगले गाडया शरीर आत्मे
विक्रय साऱ्याचा होणार

गिऱ्हाईके तर बोलु नका ही
इथे कुणाची ना चलती ?
उद्योग, न्याय अन् क्रीडा मूर्ती
सर्वच येथे हो भरती

मेर्गॅकॉर्पचे ध्येय सुसंगत
फक्त जगे पैशासाठी
जे आवश्यक ते ते करते
त्या एका ध्यासापोटी

दृश्य जरी ही नसलि शक्ती
समजु नका कुणि नगण्य हिजला
लुटालूट करि शतकोटीची
नुकते आहे कळले मजला !





## डॉलर भूषण

इतका कसा मी बावळट
मित्रांना माझ्या पडतं कोडं

पण खरं सांगु कां ?

पैशाच्या व्यवहारात
मला ना डोकंच थोडं

पै न पैचा हिशेब चोख
कर सगळे भरले रोख
आपलंच आहे
मायबाप सरकार
उगीच कशाला
करायचि तक्रार ?

पण माझ्यासारखा वेडा मीच
शोकांतिका आहे हीच

छक्केपंजे, आतले डाव
मला मुळी कळतच नाहित
वाकडया मार्गी
पावलं माझी
वळवुनसुध्दा
वळतच नाहित

पण नंतर लक्षात आलं..

व्यापारी, पुढारी
आणि काळे साब
ठेवायला नको का
त्यांचा आब ?
कर बुडवला
म्हणजे जग कां बुडलं ?
सांभाळुन नको का घ्यायला
जर आपलंच माणुस पडलं ?

दिलं करबुडव्यांना अभयदान
तर बिघडलं काय ?
आणि काळ्याचा पांढरा झाला
तर ओरडताय् काय ?

पण हवाल्याने मात्र केली
सर्वांवर कडी
म्हटलं चला....
आता तरी बसेल
आर्थिक घडी

हवाला तर हवाला
त्रास कशाला जीवाला
अर्थव्यवस्था सुधारली
तर नकोय कां तुम्हाला ?

तुम्हीच सांगा...

उगीच का वाहते
डालरची गंगा
अभयदान नसेल
तर होईल कां सांगा



आर्थिक त्रात्यांना
जपायला हवं
ह्यात काय तुम्हाला
सांगितलं नवं ?

मला वाटलं
मी समजुतदार
पण मुलं म्हणतात
बाबा .....
तुम्ही वेडे ठार
मूर्खासारखा
भरलात कर
त्याऐवजी आणायचे
लाखो डाल्लर

हाताशी घ्यायचे
गुंडाना चार
पडलिच जर असती
आयकर धाड
प्रामाणिकपणाने
भरलात कर
पण आहे का त्याची
कुणाला चाड ?

सव्वीस जानेवारी
आलिया जवळ
आता नका देऊ
कुणाला दूषण

ओळखलि असतीन
काळाची पाऊले
तर नसता कां झालात
डॉलर भूषण ?







## कशासाठी ? खुर्चीसाठी □

गेंड्याची कातडी पांघरलेले राजकारणी
ह्यांना काय म्हणावे ?
निर्लज्ज, लाचार का कारस्थानी ?

टोपी फिरवणारे विदूषक ?
का जनतेला लुटणारे तस्कर, चोर ?
प्रेताचे लचके तोडणारी गिधाडे ?
का असहायांना ओलीस ठेवणारे हरामखोर ?

आलिशान सरकारी बंगल्यांच्या
भिंतीनाही असतात कान
कारस्थाने ऐकुन तिथली
ॲल पचिनोसुध्दा खाली घालील मान



संघटित बलशाली राष्ट्र
ही कल्पनाच आता विसरायला हवी
फुलु शकणाऱ्या उमद्या राष्ट्राची
शेळी वेदीवर चढायला हवी.......

विनाकारण, नाहक

कुठलं राष्ट्र ? फुलणं काय ?
कुणाचा बळी ? बरळताय् काय ?
अहो हव्या त्या खुर्चीवर हवा तो ठोकळा
एवढंच माफियाला ठाऊक हाय

दुभंगलेला देश
हरवलेली जनता
उद्या नसलेला आज
तेव्हा भूतकाळ फक्त त्राता

शहाणेही हतबुध्द
हात चोळीत करती खेद
कोण धनुर्धर येईल पुढे
करावया लक्ष्यभेद ?



टोपी फिरवणारे विदूषक
जरूर झोडा त्यांना तुम्ही
पण त्यांच्यामागची खरी प्रेरणा
चेहेराविरहित नोकरशाही

जनतेसमोर ती येत नाही
जनतेला तोंड देत नाही
सर्व सत्ता तिच्या हाती
पण तिची परीक्षा होत नाही

पडद्यामागे राही सदा
जाब कुणा देत नाही
फासे पडु देत कसेही
ही जिंकल्याशिवाय रहात नाही



# उदे उदे ग नोकरशाही...

उदे उदे ग नोकरशाही..

हिच्या रुपाने अमोल ठेवा
इंग्रज मागे ठेवुन गेला
अनागोंदी सर्वत्र पसरवी
सवत जणु ही लोकशाहीला

उदे उदे ग नोकरशाही..

सुमार करणे प्रत्येकाला
ध्येय असे हे हिचे निरंतर
दगडालाही फुटेल पाझर
द्रवण्या आधी हिचेच अंतर

अधिकाराची चढे नशा हिज
पाठी घाली ढोंगी लुच्चे
भारतात ह्या कसे तगावे
धोपटमार्गी, नेक नि सच्चे ?

नवखा कोणी राजकारणी
घडी नव्याने बसवू पाही
हसून गालामध्ये छद्मी
दुरुन ही बया गंमत पाही



उदे उदे ग नोकरशाही..

सुधारणा कुणि कशा कराव्या ?
बदल कसे ते घडून यावे ?
फूट पाडणे थराथरांवर
एवढेच हे हिजला ठावे

कितीक नेते आले गेले
गळून पडले सगळे थाट
उन्मादाने विचारते ही
कोण आडवे माझी वाट ?



# मेरा भारत महान

चैतन्याला उदासीनता
जिद्दीलाहि मरगळ जेथे
कुठल्या आकांक्षांच्या पुढती
गगन ठेंगणे होई इथे ?

राजकारणी वापरती मग
गतकाळाचे अभिनेते
शिवराया, गांधिजी, नेहरू
कुणी नाही तर धर्मपिते

श्रेष्ठत्वाचे फुका दाखले
परंपरेची मातबरी
पुष्पकातुनी राम उडे तर
चंद्र दूर कां आजवरी ?

वर्तमान हे पोखरलेले
भविष्यातहि हा अंधार
भुलवाया भोळ्या जनतेला
घोषणाच मग ह्या आधार

गोजिरवाण्या प्रतिमा आणि
हळवे संगित साथीला
मेरा भारत महान नारा
नशा चढवितो जनतेला

क्रियाशील जे असती आज
उद्यास ह्या करण्या साकार
गाथा व्यर्थ हि गतकीर्तिची
करते त्यांना मग बेजार



असेल आमुचा भारत मोठा
बलशाली एकेकाळी
दंग राहिलो त्याच धुंदीत
म्हणुन दुर्दशा ही आली

जातपात वशिलेबाजी अन्
लाचलुचपतीना थारा
कुठल्या तोंडाने मी म्हणतो
भारत महान ये मेरा ?

सांगे कीर्ति वडिलांची तो
मूर्ख आम्हाला ठाऊक हे
बंद करा तो टीव्ही कारण
काम मला भरपूर आहे !



# दिल्लीचं लोढणं

नैराश्य अंधार
आलाय् दाटुन
आशेची तिरीप
येईल कुठुन ?

म्हणुन का फुका
बसायचं स्वस्थ ?
नशिबाला बोल
लावायचा फक्त ?

मला हे मुळिच
जमायचं नाही
म्हणुन तर आलो
सरसावुन बाही

माजलेत सगळे
समाज कंटक
पण करताय्त काय
बाकीचे घटक ?

जनतेच्या जिवावर
चालतोय् हा देश
पुढाऱ्यांचे नुसते
पोकळ आवेश



शेतातुन चाला
अनवाणी पायी
बोलतिल मग तुमच्याशी
नांगर नि गायी

हरीत क्रांती
ही शेतातुन घडे
दिल्लीला अजुन
उमज न पडे

नेकीचे कष्ट
विकासामागे
दिल्लीला अजुन
व्हायचेय जागे

मतांच्या लोभाने
हव्या त्या थापा
दिल्लीने नुसत्या
कराव्या गप्पा

धान्य पेरणी वा
वस्त्रे खेळणी
नाटक गाणी वा
पूल बांधणी

थेंबातुन घामाच्या
येते संपदा
दिल्लीस न समजे
मर्म हे सुध्दा

दिल्लीच्या लोढण्याने
साधतय् काय ?
पडायला होतय्
अडकुन पाय

झुगारुन दिलं तरि
अडणार नाही
रथाला खीळ तरि
पडणार नाही !





# इंद्रधनूचा पूल



## पण कसं ?.....

सखी मला सगळं सगळं
तुझ्यासवे भोगायचय् ग..

माझं दुःख, माझ्या आशा
माझ्या वेडया अभिलाषा
माझं जग, माझ्या कथा
माझ्या अंतरातिल व्यथा

सखी मला सगळं सगळं
तुझ्या कानी सांगायचय् ग..

पण...

भिती येते सर्वाआड
भिती पोखरते जीव
भिती खेळते माझ्याशी
जीवघेणी पाठशीव

भिती वाटे नकाराची
भिती तुझ्या दुराव्याची
भिती अवहेलनेची
भिती स्वतःच्या रागाचिही

मग...

डाव तिचा उलटाया
पवित्रा मी बदलतो
तुलाच अगतिकपणे
अपराधी ठरवतो !

पुन्हा फुलवाया सखी
तुझ्यामाझ्यातली प्रीती
हळुवारपणे तुझा
हात दे ग माझ्या हाती
आणि मला सारं सारं
तुला सांगु दे एकांती

पण कसं ?.....







# इंद्रधनूचा पूल

दुःस्वप्नांनी घाबरून तू
विचलित होशी जेव्हा
मिठीत माझ्या शांत व्हावया
हवीस राणी तेव्हा

जेव्हा जेव्हा तुला हवा मी
नसतो सदा सभोती
अपराधाची दुखरी बोच
जाळी मजला पुरती

कसे करावे क्षालन ह्याचे
मला कळेना काही
तुटले कां ग आपल्यामधले
बंध रेशमी काही ?

बोच एवढी जणू पुरे ना
म्हणून छळती का ग ?
स्वप्नेदेखिल आजकाल कां
करती माझा राग ?

कां थिजली ग सारी स्वप्ने
कां विझल्या भावना ?
कसा बांधु तो इंद्रधनूचा
पूल मला सांग ना ?



# गेले तुझ्यासवे ते

सुटली मिठी जराशी
मिटलेस तूही डोळे
एका क्षणी असावध
सगळे घडून गेले

तुटला कधी न कळला
तो बंध रेशमाचा
मी झेलण्या आधीच
मोती गळून गेले

माझ्यामधेच होतो
इतका बुडून गेलो
पुसण्या आधी तुझे ग
आसू जळून गेले



श्वासापरीस माझ्या
होतीस तू सभोती
गेलीस दूर जेव्हा
तेव्हा कळून आले

गेले तुझ्यासवे ते
क्षण शोधितो खुळा मी
गाऊ कसे ग गीत
स्वर ना जुळून आले !





## हास्यलेणं

भरले होते गच्च विमान
उतरत होता सूर्य कमान
परीकथेतिल परीसमान
वायुसुंदरी समोर छान

नाजुक साखळी गळ्याभोवती
हास्य विलसले ओठावरती
बाकी प्रतिमा सगळी धूसर
फक्त आठवे हास्य मनोहर

कॉफीचा कप हाती देता
हास्य नव्हे ते सुंदर लेणे
अजून बरसे मनात माझ्या
नक्षत्रांचे अपार देणे



असाच होतो पुन्हा एकदा
विमानातुनि जात एकटा
कॅन्सरबद्दल वाचत असता
विषण्ण झालो होतो पुरता

पुन्हा दिसे मग......
हास्य चांदणी ते ओठात
अवसेची जणु उजळे रात
दोन पळांची नजरभेट ती

अजून करते माझी साथ
अजून करते माझी साथ....



# जीवनदृष्टी



## क्षणभंगुर

मंद लुकलुकणारे दिवे
दूरवर पसरलेल्या सावल्या
सामर्थ्यशाली व्यक्ती
निद्रेच्या कुशीत विसावल्या

किती क्षणभंगुर
हे त्यांचे असणे
एखाद्या वेड्याचा वार
वा लहानसा हातबॉम्ब



संपवु शकतो
हे मौलिक जिणे
अखेर त्यांचे हे लढे
आहेत कशाविरुध्द ?

अन्याय, अत्याचार
का अमानुषत्व ?
ही तरी कारणं
आहेत का खरी ?

का कमजोरीची द्योतक
कुणाच्या तरी ?
उद्दिष्ट मनाशी
नसेल जर स्पष्ट

कुठलिच ना नीट
साधायची गोष्ट
शाश्वतच गोष्टीना
फुटतात हे अंकुर
विसरुन जा सगळे
असले क्षणभंगुर

# दैनंदिन शिक्षण□

उद्या असे ही मुख्य परिक्षा
नको गुणांची मजला भिक्षा
उच्च गुणांची असे अपेक्षा
म्हणून करतो आज समिक्षा

नसे परिक्षा फक्त उद्याची
रोज यापुढे असे द्यायची
म्हणून करतो कसुन तयारी
यशास ये मग नवी खुमारी

आव्हाने जी येतिल पुढती
मुकाबला त्या करण्यासाठी
ना उपयोगी घोकंपट्टी
पढीक उत्तरे तशीच खोटी

दहा अपयशे पचविन तेव्हा
यशास एका येईल अर्थ
गर्व मदाला देईन थारा
होईल सारे शिक्षण व्यर्थ

कष्ट अपयशे यांचे भान
मी न विसरतो जगता जगता
जरिही असली रोज परीक्षा
मला न कसली आहे चिंता



# मुखवटे

माणसामाणसांमधले संबंध
अगदी ...
प्रेमाचे, मैत्रीचे, रक्ताचे बंध
एकेकाळी ह्या नात्यांचं
एक होतं सरळ शास्त्र

कारण अभिप्रेत होता
नात्यांचा सरळ अर्थ
त्यात नव्हता
इवलासाही स्वार्थ

पण केव्हातरी त्यांना मिळाली
कां ह्या स्पर्धेच्या जगात
कुणितरी त्यांना दिली
एक कलात्मक कलाटणी

आणि अचानक ह्या नात्यांचं
नाही नाही ह्या स्वार्थाचं
छे छे छे छे ह्या गर्भितार्थाचं
म्हणजेच ह्या गुंत्यांचं
एक त्रांगडच होऊन बसलंय् मात्र !

अहो मैत्रीचे समीकरण
भेटी, अहेर ह्यांचे वर्गीकरण
रुसव्याफुगव्यांचे जमाखर्च
सगळंच झालय् वरवरचं !



प्रेमाचा हिशेब
जवळिकीचा सौदा
मैत्रीची लेव्हल
ओळखीचा फायदा
घोटलेले संवाद
मापलेले हास्य

खरं तर इथं
प्रत्येकानेच चढवलाय् मुखवटा
पण प्रत्येकालाच वाटतय्
की फक्त आपल्यालाच कळलय्
हे गूढ, हे नात्यांचं रहस्य !

मीही म्हणतो,
मुखवटा तर मुखवटा
त्याबद्दल कशाला दुखवटा ?
खुषीत असतील सगळे
तर घालु देत त्यांना

प्रश्न एवढाच आहे
की उद्या जर त्यांची
सदसद्विवेकबुध्दी
सामोरी आली
तर वेळ मिळेल कां त्यांना
मुखवटा चढवायला ?



# गर्वाचा मी गौरव करतो..

गर्वाचा मी गौरव करतो
असा गर्व जो मूक कळ्यांना
मुक्तपणाने उमलू देतो
त्या फुलण्यातुन इतरांनाही !
जगण्यासाठी स्फूर्ती देतो

गर्वाचा मी गौरव करतो
असा गर्व जो पिचून गेल्या
मनगटातही शक्ती भरतो
त्या शक्तीतुन खचून गेल्या
विकल मनांना वज्र बनवतो !







गर्वाचा मी गौरव करतो
असा गर्व जो अभिमानाने
दंड ठोकुनी उभा राहतो
आव्हानांना न डगमगता
निर्भयतेने टक्कर देतो !

गर्वाचा मी गौरव करतो
असा गर्व जो दाहक नसतो
करुणा, ममता, माया असतो
स्वतः उन्हाचे चटके सोसुन
पांथस्थांना छाया देतो !

गर्वाचा मी गौरव करतो
असा गर्व जो राष्ट्र घडवतो
मुर्दाडांना जागे करतो
गहाण पडल्या बुध्दी मनांना
चैतन्याने चूड लावतो !

गर्वाचा मी गौरव करतो
असा गर्व जो दिशाहीनांना
स्वप्नपूर्तीचा गाव दावतो
माझ्यापासुन दुरावले तरी
त्या गर्वाला मी न रोखतो !

गर्वाचा मी गौरव करतो
असा गर्व जो प्रत्येकातील
देवत्वाला स्पर्शुन जातो
ह्या जगण्याचे सार्थक करण्या
त्याच शक्तीला वंदन करतो !

# वाग्बाण कां वाक्फुले ?

शब्दांना ह्या शस्त्राहुनही
धार तेज ही असे
बाण जिव्हारी रुते त्यापरी
उरी झोंबती तसे

सुटून गेल्यावरी ज्यापरी
न ये तीर माघारी
सुटून गेल्या शब्दांचीहि
तीच अवस्था खरी

पश्चात्तापाने जळण्यापरि
जिभेस धरणे बरे
अविचारी शब्दांच्यापेक्षा
मौन असे साजिरे

शब्दांच्या ह्या नाण्याला
परि दुसरी बाजू असे
शीतलतेचा मृदु शिडकावा
त्यांच्यातुन बरसे





प्रेमिजनांचे गुंजन
अथवा ममतेची माधुरी
आशिर्वचनामधुन बरसती
सद्‌भावांच्या सरी
स्फूर्तीदायक शब्दामधुनी

दिशा मिळे जीवना
कधी उजळति शब्द धिराचे
वठलेल्याही मना
वरती डोके खाली काळिज

कंठ मधे कां असे ?
परमेशाची खास योजना
मला त्यामधे दिसे
डोक्यामधले विचार

आणि हृदयामधले भाव
मिलाफ त्यांचा मधे घडवण्या
कंठ देतसे वाव
विचार आणि सद्‌भावांचा

संगम होई जिथे
तीरांऐवजि वाणीमधुनी
फुले बरसती तिथे

# स्वप्नांचा सौदागर

येईल कां कुणी माझ्यासंगे
स्वप्नांच्या त्या नगरीला
स्वप्नांसम ना परीस कोठे
भविष्य तुमचे घडवाया !

स्वप्न पाहुया समृध्दीचे
स्वप्न जगूया सुंदरतेचे
अडचणींवरती मात करूनी
उत्तर आम्हा शोधायाचे

नका रमू पण केवळ स्वप्नी
प्रयत्नांचिही हवी सिध्दता
प्राण फुंकण्या मनोरथात
हवी साथिला क्रियाशीलता

ना संशोधन, ना संस्थापन
दारिद्र्याचे ना उच्चाटन
गर्व कशाचा आम्ही करावा ?
वांझ असे हे आमुचे शिक्षण



अर्धशतक जरि उलटुन गेले
परतंत्राची तुटुन शृंखला
एकही सुपुत्र नाही कोणी
जो भूषण ह्या भारतभूला

या तरुणांनो माझ्यासंगे
स्वप्नांच्या त्या नगरीला
स्वप्नांसम ना परीस कोठे
भविष्य तुमचे घडवाया !



## अप्रूप

सर्वस्वाची करुन आहुती
कशाला तरी वाहुन घेती
दिसती जेव्हा अशा विभूती
गात्रे माझी पुलकित होती

ज्ञानतपस्वी जेव्हा दिसती
विद्या नांदे विनय संगती
नकळत माझे कर हे जुळती
नतमस्तक मी त्यांच्यापुढती

खळखळणारे हास्य मोकळे
बागडणारे शैशव कवळे
प्रौढांमधले भावही हळवे
मोहुन मजला जाती सगळे

भारुन जातो बघता साहस
धैर्यही मजला वाटे लोभस
दिसता कोठे अतुल्य धाडस
हरखुन जाई माझे मानस



समाधान हे ज्यांच्या चित्ती
डोळ्यामधुनी वाहे तृप्ती
प्रसन्न निर्मळ ऐशा व्यक्ती
वाटे व्हावे त्यासम जगती

जे जे उत्तम उदात्त उन्नत
असे तयांचा ध्यास जयाप्रत
त्यांच्यापायी होतो मी रत
प्रणाम त्यांना करतो शतशत !



# नात्यांच्या ह्या रेशिमगाठी

नात्यांच्या ह्या रेशिमगाठी
कोण बांधतो कोणासाठी ?

कधी सुखाचे बंध जोडिती
कधी कुणाला फांस लाविती
कधी क्षणांच्या गरजेसाठी !

काही नाती देण्यासाठी
काही नाती घेण्यासाठी
स्वर्गामधल्या काही गाठी
सर्वस्वाला लुटण्यासाठी

कधी गोफ हे विणती पटकन्
जशी वीज उमटावी लक्कन्
कधी उमलते अबोध कलिका
हलके हलके गोंजारून !

खळाळणाऱ्या तारुण्यात
नात्यांनाही असतो वेग
सारे सारे समजुन घेण्या
टाकी झपाटुन तो आवेग

जुळल्या जर का सगळ्या तारा
जमून आले सातही सूर
सारे भासे सुंदर सन्निध
किती जरी ते असले दूर



अथांगता मग हळू प्रवेशे
हात गुंफुनी जाता जाता
स्पर्शातुन मग सगळे कळते
प्रेम भरवसा उरी वाहता

नाते जेव्हा असे उमलते
जसे चांदणे नभी बरसते
सरितेसम ते अधीर होते
सागरात त्या विरण्याकरता

आणि मग..

याचक ना कुणि, कुणी न दाता
विरून जाती सीमा रेखा
सर्वस्वाचे दान असे हे
तू अन् मी हा हिशेब सरता !
तू अन् मी हा हिशेब सरता !!





# अन्तर्मुख



## विदूषक

सर्कशीतला विदूषक
पहायचाय कां कुणा ?
फार कशाला लांब जाता
माझ्याकडे या ना !

विद्युत् आयोगाचा अध्यक्ष
अबब! केवढं मोठं हे पद
आश्चर्य कसलं करताय् एवढं ?
दिसला नाही म्हणून मद ?

अहो कसला आलाय् अधिकार
नुसती अधिकाराची छाया
पण तेवढया जोरावर लाळघोटे
करतात गयावाया

नुसती वरुन मान हलू दे
पुरता हलेल डोलारा
पुढच्या क्षणी दिल्लीमधुन
करीन मग मी पोबारा

अहो पदाचा हा डामडौल
आतमध्ये काही नाही
सर्कशीतला विदूषक मी
एवढे का मला कळत नाही ?



# वेडा पीर

विचार करण्याची शक्ती
ह्याला दिलीय् तरी कशाला ?
येता जाता भावनांच्या
पडतो कसा फशीला ?

कधी लढे न्यायासाठी
कधी कुढे ममतेसाठी
कधी रडे प्रेमासाठी
कधी भांडे समतेसाठी

भावविवश होतो कधी
उगवत्या सूर्यामुळे
कधी मावळतीचा चंद्र
ओलावतो याचे डोळे

कधी कुणी फसविती
कधी जातो हिणवला
का हाच घेई ओढवून
दुःख आणि वेदनेला ?

कधी भासवी स्वतःला
अविश्वासू बेदरकार
दूरदृष्टी मुळी नाही
असा कसा वेडा ठार ?

कळेल का कधी ह्याला
गुंतु नाही अंतरंगी
कारण
भावनांची देवघेव
नाही फक्त बाह्यरंगी !





# अक्कल

असहाय्य रडत होते
निराधार बुडत होते
दीनदुबळे कुढत होते
मला सर्व दिसत होते
तरिही मी धावलो नाही
डोळे जरूर पुसले
पण मान फिरवली
कारण मला अक्कल आली !

चिथावणिने मी बधलो नाही
अन्यायाने मी पेटलो नाही
लुबाडणिने मी चिडलो नाही
अहो ! लढाई जिंकायची
तर चकमकी हरायच्याच
ही शिकवण मला समजली
कारण मला अक्कल आली !

लोभापोटी मी सत्व गमावले
मोहापोटी मी तत्व गमावले
आणि स्वार्थापोटी तर मी स्वत्वही गमावले
लढण्याची मग गरजच सरली
कारण मला अक्कल आली !

अक्कल आली पण
जीवनरसच शोषुन गेली
मेलो तेव्हा जरूर होतो
शहाणा सुर्ता, कर्ता करविता
पण दोनच आसू ढाळण्यासाठी
एकही उरला नव्हता त्राता !
एकही उरला नव्हता त्राता !!





# आयुष्याचा हिशेब

बसलो जेव्हा आयुष्याचा
हिशेब मांडाया
कळले तेव्हा काय हवे मज
जीवन फुलवाया

क्रोध नको मज
मोह नको मज
अधीरताही
असे त्याज्य मज
प्रगतिपथावर ह्या धोंडयांनी
नकोच अडवाया

विद्या मिळते
पुस्तकातुनी
अनुभव मिळतो
व्यवहारातुनी
हृदयातुनी पण संयम करुणा
नकोत हरवाया

भीती नको मज
नको वासना
दरवळु दे मनी
प्रेमभावना
सहिष्णुता अन् सहनशीलता
हवीच सुखवाया

अविचाराची
नकोच संगत
सखोलतेने
येई रंगत
थोडक्यात मज ज्ञान हवे,
हे जीवन फुलवाया





## पडछाया

गतकाळाची रुद्र सावली
झाकोळतसे भविष्यकाळा
वर्तमानही गद्य निरस हे
रंग कुठुन ये आयुष्याला ?

गतकाळातिल चुका अनंत
कधीच पुसल्या नाही जात
मोजमाप पण त्यावर माझे
सर्वांना एवढेच ज्ञात

पूर्वग्रहांचे दोषारोपण
गैरसमजुती छिद्रान्वेषण
जंजाळातुन मुक्त व्हावया
कुठले तोडायाचे बंधन ?

प्रीतीलाही नाही मुक्ती
त्याही क्षेत्री चुका भिवविती
कसे फुटावे नवीन अंकुर
जुन्या चुकांची गस्त सभोती

जगतो केवळ वर्तमानी ह्या
मनोरथे ही मम सोबतीला

कारण....

गतकाळाची रुद्र सावली
झाकोळतसे भविष्यकाळा





## मी एक रोबो□

इतके दिवस मी समजत होतो
स्वतःचे असे खास व्यक्तीमत्व असणारी
मी एक स्वतंत्र व्यक्ती आहे,
प्रच्छन्न पणे जगायची मला मुक्ती आहे

पण अलिकडेच हे उमजलं
की ही सारी भ्रांती आहे ! □

मी ह्या जगात येता क्षणी
उघडण्याआधी माझी पापणी
तुम्हीच ठरवून टाकले होते
मी काय नि कसे बघायचे ते !□





माझा पहिला हुंकार उमटण्याआधीच
मी काय नि कसे बोलायचे
तेही तुम्हीच नक्की केलेत ना ?□

मी स्वतः सारासार विचार करून
काही निवड करण्यापूर्वीच
बरोबर काय, खरे काय
हेही ठरवलेत आपणच !□

मी जन्मायच्या आधीच
ठरला माझा धर्म, माझी जात,
माझा विश्‍वास, माझी भाषा
माझे मित्र तुम्ही निवडलेत
आणि शत्रूदेखील तुम्हीच ठरवलेत !□

मी तर उरलो केवळ एक शिपाई
तुमच्या आज्ञेबाहेर नसणारा
समाजीक रुढींनी बांधलेला
बालपणीच सग्यासोयऱ्यांनी
प्रोग्राम केलेला एक कळसुत्री रोबो
...रिमोट कन्ट्रोलवर चालणारा !



# राजीवनामा



## वारसा

सार्वभौम अन् सर्वशक्तीमान
अनभिषिक्त जी होती राणी
अशा आईच्या पोटी येणे
सुरु होतसे इथे कहाणी

अशा पित्याची होती बेटी
जो कसलेला होता नेता
स्वप्न स्वार्थ ह्या मिलाफातुनी
अमाप मिळवी लोकप्रियता

सतरा सतरा वर्षे दोघे
तळपत होते राजकारणी
जिद्द चिकाटी उच्च आकांक्षा
दोघांच्याही अंतःकरणी



आतुर होते दोघेही जण
असाध्य स्वप्ना कवटाळाया
पंचशील समता अन् शांती
अशा पताका फडकावाया

अभिनय पडला उणा कुठे ना
रंगमंचही विराट होता
नांव कोरले इतिहासात
प्रेक्षकवर्गही अफाट होता

देवीसमान होता तिजला
सामान्यांच्या हृदयी मान
वाघत्वचेतील शेळ्यामेंढया
हाकत होती ही बलवान





## बालपण

मागिल बाजू रंगपटात
बसले होते छावे दोन
त्यांच्या नकळत कळले त्यांना
नेते कोण, अभिनेते कोण ?

न्याय, कायदा, समता, शांती
युध्द, संपदा, धोरण, नीती
राजनीतिचा हरेक पैलू
चमकत होता त्यांच्यापुढती



पडदा पडल्यानंतर बघती
रंगामागिल अंतरंग ते
राष्ट्रोध्दारा झटती कोण
स्वार्थाने कोण भरले होते

कुणास मिळते ऐशी संधी
इतक्या जवळुन बघावयाची
काय नोंदले त्यांच्या हृदयी
फक्त कल्पना करावयाची





## नियतीचे फासे

सोनसकाळी मोठयाला मग
लागे बाह्यजगाची चाहुल
पड्यामागुन डोकावुन तो
हलके तेथे टाकी पाऊल

दिसली त्याला साधी माणसे
ऊनपावसामधे राबता
हरिनामाचे स्मरण करित ती
सोसत होती हालअपेष्टा

शहरामधले नवश्रीमंत
सफेद झूलीतील कावळे
पश्चिम संस्कृति अंगिकारण्या
उत्सुक असती त्यातिल सगळे



राग लोभ अन् प्रेम निराशा
हक्क जाणिवा यश अभिलाषा
कळले त्याला जीवन म्हणजे
नाही नुसता खेळ तमाशा !

नवीन स्वप्ने नव आकांक्षा
कवटाळुनि तो धरे उराशी
मुक्त जाहल्या पक्ष्यापरी तो
पंख पसरुनी उडे आकाशी

अन् अचानक.....

ज्या भावाला राज्य हवे तो
अंत पावला विमान पडुनी
राणीचीही हत्या झाली
फासे नशिबाचे हे फिरुनी

इंद्रपुरीचा राजपुत्र कुणी
जणु अवतरला पृथ्वीवरती
नकळत त्याच्या नियतीनेही
राज्य लादले त्याच्यावरती !





## बंदिवान

नकळत त्याने प्रवेश केला
पिंजऱ्यामध्ये सोन्याच्या
सुटले त्याचे निळे आकाश
चिंध्या झाल्या स्वप्नांच्या

पड्यामागिल हुजरे आणि
पड्यापुढले अभिनेते
कठपुतळि करण्याला त्याची
सर्व जणू टपले होते

करीत होता धडपड तोही
स्वत्व गमावु न देण्याची
तारेवरची कसरत होती
स्वप्ने समूर्त करण्याची



विझून गेली होती ज्योती
जिने उजळली असती वाट
खुषमस्करी अन् तोंडपुजे पण
मुळि न सोडती त्याची पाठ

जिब्राल्टरच्या खडकापरी तो
होता निश्चल तूफानी
झेलत होता विराट लाटा
मुजरा केला सर्वांनी

कळले होते त्याला पुरते
सत्ता नुसता खेळ नव्हे
अखंड जाणिव हवी जागती
जनतेला ह्या काय हवे

रूप देखणे, हास्य मनोहर
तळमळ त्याच्या मनातली
लुब्ध जाहली होती जनता
जणू भेटला त्या वाली !



## अखंड यज्ञ

अखंड यज्ञ
संपतो कां कधी ?
त्याला ना अंत
त्याला ना आदि

वाटेवर लागतात
वळणे जशी
टाकायची असतात
पाऊले तशी

गोष्टीचे एका
ठेवायचे भान
पुनरुक्तीला
इथे न स्थान

प्रत्येक वळण
हे एकदाच भेटते
जपुनच पाऊल
टाकायचे असते

आजचे वर्तमान
हा उद्याचा इतिहास
जाणिव ही हृदयी
करु दे निवास



# शोध चालूच आहे

त्या कातरवेळी
त्या धगधगत्या ज्वालांमध्ये
लपेटून गेली
त्यांच्याइतकीच धगधगती
त्याच्या आईच्या जीवनाची ज्वाला....

अन् त्या ज्वालांनी फाकली
त्या राजबिंडया चेहेऱ्यावर
एक मनोहर आभा
सगळ्यांना वाटलं
की हीच ती
युगानुयुगे वाट पाहिलेली
उषःप्रभा !

संपला भ्रष्टाचार
संपला अंधःकार
संपली लाचारी
संपली गुन्हेगारी
लोकशाहीला अखेर
लाभला कैवारी ...





प्रत्येक भारतीयाने
त्याच्या एकवटलेल्या आकांक्षांची
अमूर्त स्वप्नांची
आरती त्याला ओवाळली
त्याच्या परीसस्पर्शाने
त्यांच्या जीवनाचे
संपूर्ण राष्ट्राचे
भविष्यच स्वर्णमय होणार
ह्याची त्यांना खात्री पटली...

पण तो ...तो तोच होता
तुझे आहे तुजपाशीतल्या
आचार्याप्रमाणे त्याने
ती अवजड झूल पेलायचा
लोकांनी लादलेल्या
आदर्श प्रतिमेला जपायचा
आटोकाट प्रयत्नही केला
त्याच्यापरीने



पण चुकीच्या पट्टीत
एखाद्याला गायला लावून
गाणे बेसूर झाले
तर दोष कुणाचा ?
गाणाऱ्याचा का सांगणाऱ्याचा ?

थोडक्यात म्हणजे
अजूनही स्वतःच्या पट्टीत
गाऊ शकणाऱ्या आणि
इतरांनाही संघगीतात
सामील करु शकणाऱ्या
गायकाचा शोध
चालूच आहे !





# निकटवर्ती सल्लागार

अरे मित्रा सुहृदा..
आम्ही आहोत ना तुझ्याभोवती
तू फक्त नेता अस
अन् सूत्र राहू देत आमुच्या हाती !

अरे परमप्रिय दोस्ता..
प्रतिमा तुझी बदल ना जरा
सुडौल सुजाण सुसंस्कृत सभ्य
असा कां नेता असतो खरा ?

गेंडयाची कातडी, तळमळीचा अभाव
बेडौल शरीर, स्वार्थी आकांक्षा
जनतेला नेता कळायचा तर
एवढया तर किमान आहेत अपेक्षा !

त्यागाचे वलय तर हवेच हवे
तुला न कळला त्याचा प्रभाव
सुखासिन दिसून चालेल कसं ?
लागायचा कसा मग आमचा निभाव ?



तोफच जर का कुणी डागली
आघाडीवर तूच हवास
जरूर तूजला करू हुतात्मा
खुर्चि रिकामी विनाप्रयास !

अरे ! जिवलग सख्या....

जरुरहि नाही ह्या तोफेची
खच्ची तुजला करण्यासाठी
शत्रु कशाला हवेत तुजला
मित्र यापरी असता गांठी !





## उत्तिष्ठत जागृत

हिंसेचा लालिमा अन्
भ्रष्टाचाराचा कालिमा
डागाळतोय् तुझी
धुतल्या तांदळाचि प्रतिमा

वैऱ्याची रात्र आहे
जागा हो राजा
मातृभूमिलाच विकायला
निघतेय् ही प्रजा

फुगलेल्या अपेक्षा अन्
अवाजवी आकांक्षा
ह्या सगळ्यांचा मेळ
तू घालणारेस कसा ?

क्षितिजावर ढग
जमलेले आहेत
अंतर्गत वादळ
धुमसते आहे

पण अजुनही वेळ
गेलेली नाही
कारण सुकाणु तुझ्याच
हातात आहे

जनतेच्या गळ्यातला
ताईत तू
झिडकारु नको
हा विश्वास तू

नीरक्षीर विवेक
जाणून तू
वरवरच्या रंगा
भुलु नकोस तू





## श्री विष्णुस आवाहन...

आज हवा एक असा पुढारी
जो सर्वांचा हो कैवारी
असे रसायन असले कोठे
दाखवाल कां आम्हाला ते ?

ॐ राजकीय पुढारी
ॐ सामाजिक पुढारी
ॐ हजुर पुढारी
ॐ मजुर पुढारी
ॐ धार्मिक पुढारी
ॐ आर्थिक पुढारी
ॐ दक्षिणी पुढारी
ॐ उत्तरी पुढारी
ॐ गल्ली पुढारी
ॐ दिल्ली पुढारी.....

विष्णुसहस्त्रनामापरि ही
संपणार ना यादी कधीही

तेव्हा गंमत अशी आहे की ...

नसे पुढाऱ्यांची कमतरता
पण ह्याही सर्वा हवाय नेता !

जो सर्वांना ठेवी काबुत
त्यास नसावी भाषा जात
धर्माचाही नकोच शिक्का
फारच उत्तम राज्यातीत

दूरदृष्टी त्या जरूर असावी
विज्ञानाची कास धरावी
विकेंद्रिकरणाची जयगाथा
सर्वापुढती त्याने गावी

नोकरशाही उच्चनीचता
महत्व त्यांचे सरले आता
सहयोगाचे नवीन युग हे
त्यास कळावी त्याची महता

जपान्यास ना गरज भासली
एकच लोकोत्तर नेत्याची
राखेतुन जर्मनी सावरे
नसे आठवण त्या हिटलरची

पण....

भारतमाता आमुची आई
पुढाऱ्याविना अनाथ होई
कशी गुलामी वृत्ती जावी
अजुन कुणाला कळले नाही

वाट पाहतो हे श्रीविष्णु
तुझ्या दहाव्या अवताराची
मोक्षमुक्ती ह्या भारतभूस
कशी त्याविना मिळावयाची ?





# शोध





## कोडं

पहिल्या हिरव्या तृणपात्याचा
आज असे सत्कार
मंगेशाची प्रतिभा करते
वंदन त्यास त्रिवार

आम्ही केवळ त्या प्रतिभेचा
करतो जयजयकार
अन् निसर्गावरी बलात्कार हा
करतो अपरंपार

अण्वस्त्रांचा सुसाट मारा
करतो धरतीवरती
अविचाराने जंगल तोडुन
विवस्त्र करतो पुरती

ऐहिक सुखसोयींच्यासाठी
अखंड लुटतो तिजला
भविष्यातल्या कुणासाठिही
बचत न करणे मजला

निसर्गावरी विजय मिळवला
धुंदी अजून तरळे
ओझोन्च्या पटलाची चिंता
आज मला ना जाळे

जळता जळता तृणपात्याने
प्रश्न मला केला
वसंत अजुनि सरला नसता
प्राण कसा गेला ?



# फ्लॅश बॅक

ऐकायाला उत्सुक
आहात ना तुम्ही
मग सांगु कां माझी
सुरस कहाणी ?

एक होता राजा अन्
एक होती राणी

पण व्हे व्हे व्हे व्हे....

सुसंगत संगतवार
अशी जमायचिच नाही
कारण हातचं राखुन मला काही
सांगताच येत नाही

असं करुया फ्लॅशबॅकचं
आहे नवीन तंत्र
शेवट आधी सांगीन आणि
सुरुवात होईल नंतर

कथा कथनासाठी किती
आहे सुंदर तंत्र
आरंभाला कसेही बदला
शेवट ठरल्यानंतर !

खऱ्या जीवनामधली वळणे
कां न बदलता येती ?
फ्लॅशबॅकचे नवीन तंत्र
आहे कुणा माहिती ?





# पटावरील प्यादी

राग लोभ अन् दुःख वेदना
मद मत्सर अन् प्रेमभावना
तिसरा डोळा जधी उघडशी
महत्व त्यांचे काय सांग ना ?

कधी करीशी कीव आमुची
सरशि इवली घडून देशी
बेडकीपरी फुगवुन आम्हा
वृथाभिमान हा उगा पोसिशी

जातिवंत बलवंतापरि तू
क्वचित् आपुले बल वापरशी
धुंदी उतरे पार आमुची
तुझा तडाखा जेव्हा देशी

बुध्दीबळाच्या जगत्पटावर
आम्ही प्यादी इवली इवली
फिरतो केवळ तव इच्छेने
कृपा असावी हे बलशाली !



# प्रभु कृपा

फिरायच्या वाटेवर
लागते एक चाहुल
प्रभु कृपा बंगल्याशी
थांबते हे पाऊल

वाटे मज मौज
वाचुन ते नांव
सरडयाची अखेर
कुंपणाशी धाव

नुरवी पुरवी प्रेम
कृपा जयाची
बंगला कां फक्त
कृपा तयाची ?

प्रत्येकच श्वास
ही उधारी असे
मग सुटुन हे भान
चालेलच कसे ?

